दैनिक

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

वैभव विवेक स्वामी
संपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ५ वे अंक -२५४ शनिवार,दि.१७ मे २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४

Beed Daily Marathi Year-5th Issue-254 Saturday, Dt.17 May 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

## परळीत गावठी पिस्टलसह युवक ताब्यात

परळी / प्रतिनिधी

परळी शहरातील गुन्हेगारी प्रवृत्तीचे आणखी एक प्रकरण उजेडात आले असून गावठी पिस्टल व जिवंत मॅगझीनसह युवकांना संभाजी नगर पोलिसांनी ताब्यात घेतले. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, अमोल रामहारी कांदे, (वय ३२ वर्ष, रा. माणिक नगर, परळी वै), २) पांडुरंग प्रकाश शेंडगे, (वय ३० वर्ष, रा.एल. आय. सी. कॉलणी, रिंग रोड लातुर), ३) सतिश मुंडे रा डाबी ता परळी ४) मनोहर मुंडे रा बेलबा ता परळी हे युवक एकत्र असताना विनापरवाना बेकायदेशिरीत्या एक गावठी पिस्टल (अग्निशस्त्र) काडतुससह रेल्वेस्टेशन परिसरात ताब्यात बाळगताना संभाजी नगर पोलिसांना आढळून आले. या प्रकरणी ठाण्याचे कर्मचारी विष्णु बाजीराव सानप यांच्या फिर्यादीवरून गुरन् १०४/२०२५ कलम कलम ३,,२५ भारतीय शस्त्र अधिनियम सन १९५९ कायद्यानव्ये अमोल रामहारी कांदे, वय ३२ वर्ष, रा. माणिक नगर, परळी वै. जि बीड शेंडगे, क्य ३० वर्ष, रा एल आय सी कॉलणी, रिंग रोड लातुर २) पांडुरंग प्रकाश ३) सतिश मुंडे रा डाबी ता परळी ४) मनोहर मुंडे रा बेलबा ता परळी या चार व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी अधिक तपास ठाण्याचे सपोनि जाधव हे करत आहेत.

# केज शहरातील मुख्य रस्त्यावर हीट अँड रन ची घटना

## कंटेनरने सात ते आठ वाहनाना धडक देऊन चिरडले





### एक महिला ठार तर २० ते २५ जण जखमी झाले असल्याची शक्यता

केज/प्रतिनिधी

केज शहरातील मुख्य रस्त्यावर हीट अँड रन ची घटना घडली असून केज मध्ये कंटेनर ने सात ते आठ वाहनांना धडक देऊन चिरडले आहे यात एक महिला जागीच ठार झाली असून २० ते २५ जण गंभीर जखमी झाले असल्याची माहिती मिळाली आहे.नेकनुर पासुन हा कंटेनर भरधाव वेगाने जात होता.घटनास्थळाहून फरार झालेला कंटेनर लोखंडी सावरगाव नजिक पलटी झाला असून संप्तत जमावाने कंटेनर दिला पेटवुन दिला आहे.याबाबत सविस्तर माहिती अशी की,नेकनुर हुन भरधाव वेगात निघालेल्या एका कंटेनरने सात ते आठ वाहनाना धडक देऊन चिरडल्याची व यात एक महिला ठार तर २० ते २५ जण जखमी झाल्याची दुर्देवी घटना आज दुपारी केज मध्ये घडली असून घटना स्थळाहून फरारझालेला कंटेनर पुढे लोखंडी सावरगाव नजिकपलटी झाला आहे.दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास बीड कडून भरधाव वेगात नेकनूर मार्गे केज मध्ये आलेल्या डी डी ०१-झेड ९७७१ क्रमांकाच्या कंटेनरने सर्वप्रथम नेकनूर येथे काही जणांना चिरडले व त्यानंतर केज मधील हॉटेल अनिल



भोजनालय पासून पुढे सात ते आठ वाहनांना चिरडत व पुढे काही वाहनांना फरपटत नेऊन सदर कंटेनर आंबाजोगाईच्या दिशेने फरार झाला प्राथमिक माहितीनुसार यामध्ये एक महिला ठार तर २० ते २५ जण जखमी झाले असून यातील आठ ते दहा जण गंभीर असून जखमीला आंबेजोगाईच्या स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय रुग्णालयात हलवण्यात आल्याचे वृत्त असून केज शहरात आठवडी बाजार असल्याने रस्त्या वर तोबा गर्दी असताना या दुर्घटनेत मोठा अनर्थ टळला आहे.सदर कंटेनर अनेक वाहनांना धडक देऊनअंबाजोगाई कडे जात असताना वाटेत त्याने चंदन सावरगाव नजिक आणखी एका वाहन चालकास चिरडलेअसून या दुर्घटनेची माहिती मिळताच युसुफवडगाव पोलीस स्टेशनच्या पोलीस कर्मचाऱ्यांनी केज रोडवर येऊन सदर कंटेनरचा पाठलाग सुरू केला असता हा कंटेनर लोखंडी सावरगाव येथे पलटी झाला असून केज पासून पाठलाग केलेल्या संतप्त जमावा ने नंतर हा कंटेनर पेटवून दिला आहे. दरम्यान रस्त्यावर किती जणांना धडक दिली याची माहिती उपलब्ध झाली नसुन चालकाने अंमली पदार्थांचे सेवन केले असल्याची शक्यता नागरिकांतून व्यक्त होत आहे.केज शहरात तरी गतिरोधक बसविण्याची मागणी नागरीक करत आहेत.

# शाळा परिसरातून पान टपऱ्यांच्या जोडीने एनर्जी ड्रिंक हटवा




अहिल्यानगर । प्रशांत बाफना

राज्य शासनाने शाळांसाठी जाहीर केलेल्या नवीन नियमावलीनुसार आता शाळेपासून १ किलोमीटर परिसरात तंबाखूजन्य पदार्थ विकले जाणाऱ्या पानटपऱ्या नसाव्यात, असे आदेशित केले आहे. मात्र, पानटपऱ्यांसह शाळांच्या परिसरात विकले जाणारे घातक असे एनज ड्रिंक देखील हटवा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते हेरंब कुलकर्णी यांनी केली आहे.

हेरंब कुलकण यांनी याबाबत म्हटले आहे की, शासनाच्या या निर्णयाचे आपण स्वागत करतो. कारण दीड वर्षापूव शाळेशेजारी असलेली पानटपरी हटवली म्हणून आपणावर सुपारी देऊन प्राणघातक हल्ला झाला होता. या निर्णयाने माझे सांडलेले रक्त कारणी लागले, असे कुलकण यांनी म्हटले आहे.फक्त याची अंमलबजावणी करताना शाळेच्या मुख्याध्यापकांसोबतच त्या गावातील ग्रामपंचायत, नगरपालिका, नगरपंचायत, महापालिका व पोलिस यांच्यावरही जबाबदारी निश्चित करावी. १५ जूनला शाळा सुरू होण्यापूव प्रशासनाने शाळेभोवती असलेल्या या सर्व टपऱ्या काढून द्याव्यात असेही हेरंब कुलकर्णी यांनी म्हटले आहे.

# अवैध गाळ उपशाच्या टिप्परने उपळी ते धुनकवाड रस्त्याची लागतीय वाट

### या रस्त्यावरुन वाहतुकीस आठ टनापेक्षा जास्त नाही परवानगी वडवणी व धारुर तहसीलदारांना दिले पत्र पण कारवाई काहीच नाही

वडवणी/प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील उपळी ते धुनकवाड नं.२ ते हा पंतप्रधान ग्रामसडक योजने अंतर्गत चार किलोमीटरचा रस्ता झाला आहे.परंतु ह्या रस्त्यावरुन सध्या अवैध गाळ उपसा मोठ्या प्रमाणात सुरू असुन या रस्त्यावरून आठ टन पेक्षा जास्त क्षमतेचे वाहन घेऊन जाण्यास मनाई करण्यात आले आहे परंतु तरीसुद्धा या रस्त्यावरून अवैध गाळ उपशाचे वाहन मोठ्या प्रमाणात जात असून हा रस्ता खराब होत आहे व ह्या रस्त्याचे आत्ताच पंधरा दिवसांपुर्वी डांबरीकरण झाले असल्याने हा रस्ता जड वाहने घेऊन जाण्याच्या क्षमतेचा नाही.



उपळी ते धुनकवाड नं.२ हा रस्ता गेल्या तीस वर्षापासून ह्या रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाली होती.परंतु माजी खासदार प्रीतमताई मुंडे यांनी पंतप्रधान ग्रामसडक योजनेमध्ये हा रस्ता घेऊन यासाठी जवळपास चार कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला व या रस्त्याला मंजुरी मिळाली व ह्या रस्त्याचे काम ही प्रगतीपथावर आहे.परंतु हा रस्ता टिकाऊ होण्यासाठी व टिकाऊ राहण्यासाठी या रस्त्यावर ओव्हरलोड पद्धतीने जे की अवैध गाळ वाहतूक होत आहे यामुळे हा रस्ता खराब

(उर्वरीत पान २ वर)

## मौजे पराडा येथील शेतकरी शेख जैनुद्दीन शेख रहीमोद्दीन यांचे अवकाळी पावसाने कुसुम कंपनीचे सोलार पॅनल झाले नुकसान



अंबड (प्रतिनिधी)

तालुक्यातील मौजे पराडा येथील शेतकरी शेख जैनुद्दीन शेख रहीमोद्दीन रा पराडा ता अंबड जि जालना यांचे दि,०५/०५/२०२५ सोमवारी सायंकाळी पाच च्या सुमारास गट क्रमांक ६९ मध्ये अवकाळी पाऊस व सुसाट वाऱ्यामुळे कुसुम कंपनीचे सोलार पॅनल चे मोठे नुकसान झाले असून तरी कुसुम कंपनीने शेतकरी शेख जैनुद्दीन शेख रहीमोद्दीन यांचें नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे



## भटक्या -विमुक्त आता कोठेही मोफत राशन मिळणार - डॉ लक्ष्मण जाधव

बीड (प्रतिनिधी)

ओबीसी भटके-विमुक्त जाती जमातींच्या उत्थानासाठी लोकनेत्या पंकजाताई साहेब मुंडे व मा.खा.डॉ.प्रीतमताई साहेब मुंडे यांच्या नेतृत्वाखाली काम करत असताना,आज राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे साहेबांना मागे नागपूर येथे भटक्या -विमुक्त जाती जमातींच्या शिबिरावेळी निवेदन सादर करण्यात आले होते.नंतरही पाठपुरावा चालूच होता. त्यातील एक मागणी पूर्ण म्हणजे भटक्या -विमुक्त आता कोठेही मोफत राशन मिळणार असल्याचे डॉ लक्ष्मण जाधव यांनी स्पष्ट करून या निर्णयाचे स्वागत केले आहे.

# सीसीटीव्ही सारख्या नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून स्वसंरक्षण करा,कोणाचीही भीती बाळगू नका

### कोड स्कॅन करा माहिती पाठवा,मी स्वत: दखल घेईल - पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत

आष्टी ।प्रतिनिधी

येत्या महिनाअखेर पोलीस कर्मचाऱ्यांच्या बदल्या होणार असून त्यावेळी सर्व पोलीस ठाण्यांना आवश्यक असतील तितके कर्मचारी नियुक्त करण्यात येतील. प्रत्येक पोलीस ठाण्याच्या ठाणे अंमलदारांना प्रशिक्षित करण्यात येईल. प्रत्येक पोलीस स्टेशन कार्यक्षेत्रात जनता दरबार घेण्यात येईल आणि कुणालाही न घाबरता कोणाच्याही विरुद्ध तक्रार करायची असेल तर माझा बीड पोलीस अधीक्षकांचा तयार केलेल्या क्यूआर कोड वर माहिती पाठवा सर्व माहिती गुप्त राहील आणि त्यानंतर तात्काळ पोलीस कार्यवाही करतील याविषयी



निश्चित रहावे असे प्रतिपादन बीड पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी केले.

आष्टी येथील आष्टी उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यक्षेत्रातील प्रमुख व्यापारी नागरिक आणि पत्रकार यांच्या बैठकीमध्ये प्रमुख मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी आष्टी पोलीस उपविभागीय अधिकारी बाळकृष्ण हणपुडे पाटील, आष्टीचे पोलीस निरीक्षक शरद भुतेकर, पाटोदा पोलीस निरीक्षक सोमनाथ जाधव, अंभोरा सहाय्यक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे, सहाय्यक पोलीस निरीक्षक विक्रांत हिंगे उपस्थित होते. पुढे बोलताना पोलीस अधीक्षक म्हणाले प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये जनता दरबार घेण्यात येणार असून त्यांच्याकडून सूचना मागवणार आहे. या बैठका सतत घेण्यात येतील त्यातून पोलीस आणि जनता सुसंवाद निर्माण होईल. बीड जिल्ह्यातील जनता अत्यंत संवेदनशील

(उर्वरीत पान २ वर)

# कासारी येथे बैलगाडा शर्यतीचा थरार

## जालना च्या पक्षा-पिस्टन बैलजोडीने मैदान मारले

दिंद्रुड (प्रतिनिधी)

धारूर तालुक्यातील कासारी येथे युवानेते भागवत दराडे यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यस्तरीय बैलगाडा शर्यत बुधवारी पार पडली. हजारो शौकिनांच्या उपस्थितीत जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील धाकलगाव येथील शेतकरी चंद्रकांत खोमने व प्रताप नाझरकर यांच्या पक्षा-पिस्टन बैलजोडीने रोमांचकारी विजय मिळवत उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. ५१ हजार रुपये रोख बक्षीस देत बैलगाडा मालकाचा सन्मान करण्यात आला.

कासारी येथे मागील तिन वर्षांपासून जैतापूर सरपंच भागवत दराडे यांच्या वाढदिवस निमित्ताने बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात येते. बुधवारी आयोजित बैलगाडा शर्यतीचे उद्घाटन माजी सरपंच शामसुंदर बडे, सदाशिव बडे, मनोहर बडे, जमरी सय्यद, प्रशांत बडे, अंकुश बडे यांच्या हस्ते करण्यात आले. १४५ बैलगाडा मालकांनी राज्यभरातून कासारी येथे दाखल होत शर्यतीत सहभाग नोंदवला. आठ राऊंड मध्ये प्रथम व द्वितीय येणाऱ्या बैलगाड्यांची उपांत्य फेरी घेण्यात आली. चार उपांत्य फेरीत विजय मिळवणाऱ्या आठ बैलजोड्यांचा अंतिम सामना खेळविण्यात आला. डोक्यावर प्रचंड उन तळपत असताना

(उर्वरीत पान २ वर)



शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

## संपादकीय

# राष्ट्रपतींचे प्रश्नोपनिषद

तमिळनाडूचे राज्यपाल आर. एन. रवी विरुद्ध राज्य सरकार यांच्या खटल्यात न्यायालयाचा निर्णय आणि राष्ट्रपती–राज्यपालांना विधेयकमान्यतेसाठी एक ते तीन महिन्यांची मुदत, यानंतर हा संघर्ष सुरू झाला आहे.

विधेयकांना मान्यता देण्यासाठी राष्ट्रपती आणि राज्यपाल यांना मुदत घालून देणाऱ्या निवाड्याच्या अनुषंगाने राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सर्वोच्च न्यायालयास विचारलेल्या १४ प्रश्नांमधून लोकशाहीच्या दोन स्तंभांमध्ये पुन्हा संघर्ष उभा राहणार काय, असा प्रश्न उपस्थित होतो. नवे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी पदाची शपथ घेताच राष्ट्रपतींनी पाठविलेल्या प्रश्नांमधून न्यायसंस्थेपुढे उभ्या राहू पाहणाऱ्या आव्हानाला त्यांना तोंड द्यावे लागणार, असे दिसते. तमिळनाडूचे राज्यपाल आर. एन. रवी विरुद्ध राज्य सरकार यांच्या खटल्यात न्यायालयाचा निर्णय आणि राष्ट्रपती–राज्यपालांना विधेयकमान्यतेसाठी एक ते तीन महिन्यांची मुदत, यानंतर हा संघर्ष सुरू झाला आहे.

उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी याच संदर्भात सर्वोच्च न्यायालयावर केलेली टीका आणि 'संसद नव्हे, संविधानच श्रेष्ठ,' हे सर्वोच्च न्यायालयाचे स्पष्टीकरण, ही पार्श्वभूमी याला आहे. 'विधेयक मंजूर झाल्यावर राज्यपालांपुढे कोणते घटनात्मक पर्याय आहेत', 'राज्यपालांनी निर्णय घेताना मंत्रिमंडळाचा सल्ला स्वीकारणे बंधनकारक आहे का', 'राष्ट्रपती–राज्यपाल यांच्या निर्णयाला न्यायालयात आव्हान देता येते का', 'घटनेतील कलम ३६१ हे राज्यपालांच्या निर्णयाचा आढावा घेण्यास प्रतिबंध करू शकते का', तसेच विधेयकांवर निर्णय घेण्यासाठी घटनेत राज्यपालांना कालमर्यादा नसेल, तर न्यायालय ती ठरवू शकते का', 'घटनेतील कलम १४२नुसार राष्ट्रपती किंवा राज्यपालांचे आदेश बदलता येतात का' आणि 'कलम २००नुसार राज्यपालांच्या मान्यतेशिवाय राज्य सरकार कायदे करू शकते का,' अशा १४ प्रश्नांचा त्यात समावेश आहे.

तमिळनाडूप्रकरणी निवाडा आल्यानंतर काही अभ्यासकांकडून आणि सत्ताधारी गोटातूनही न्यायालयीन सक्रियतेचा मुद्दा उपस्थित करण्यात आला; तसेच राष्ट्रपती–राज्यपालांच्या विशेषाधिकारांवर गदा येत असल्याची आणि सर्वोच्च न्यायालय घटनेचा 'अन्वयार्थ' लावण्याऐवजी अधिकारक्षेत्राबाहेर जाऊन 'दुरुस्ती' करीत असल्याचीही टीका झाली. राष्ट्रपतींच्या प्रश्नावलीमध्ये याच आक्षेपांचे प्रतिबिंब दिसते. यांपैकी काही प्रश्नांबाबत घटनेत नेमक्या तरतुदी आहेत. प्रामुख्याने तमिळनाडूचा निकाल दोन न्यायमूर्तींच्या खंडपीठाने दिला असताना, 'अशा घटनात्मक विषयांवर किमान पाच सदस्यांच्या खंडपीठाने निकाल देणे अपेक्षित आहे,' हा आक्षेप प्रश्नावलीतून दिसतो; तसेच राज्यपालांच्या मान्यतेशिवाय सरकारला कायदे करता येत नाहीत, हेही स्पष्टपणे नमूद आहे. मात्र, घटनेतील कलम १४२नुसार मुख्यत: राष्ट्रपती–राज्यपालांना विधेयकांना मान्यतेस अनिश्चित काळासाठी विलंब करण्याच्या अधिकारांचा कायदेशीर आढावा घेण्याचे अधिकार सर्वोच्च न्यायालयास आहेत का, हा प्रश्न साऱ्याच्या मुळाशी दिसतो. मूलभूत अधिकार, कायद्याचे राज्य आणि लोकशाही तत्त्वांचे संरक्षण या उद्देशांनी कलम १४२चा वापर होतो. त्यानुसार एखाद्या विषयाबाबत कायद्यात अस्पष्टता असेल, तर कलम १४२चा वापर करून सर्वोच्च न्यायालय परिस्थितीनुसार आदेश देऊ शकते, असे घटनेत नमूद असल्याचा संदर्भ तमिळनाडू निकालास आहे. कलम ३६१नुसार राज्यपालांना संरक्षण असले, तरी त्यांचे निर्णय हे घटनेच्या कसोटीवर पारखण्याचे म्हणजेच 'न्यायालयीन आढाव्या'चे अधिकार सर्वोच्च न्यायालयाला आहेत, हे लक्षणीय.

घटनाकारांनी कोणत्याही स्तंभास अमर्याद अधिकार दिलेले नाहीत. मात्र, देशातील कोणताही निर्णय किंवा धोरणे घटनेशी सुसंगत आहेत का, हे तपासण्याचा; म्हणजेच त्याचा न्यायालयीन आढावा घेण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयास आहे. घटनेचा अन्वयार्थ लावणे, एवढेच सर्वोच्च न्यायालयाचे अधिकारक्षेत्र मानले, तरी त्यांचे अनेक निर्णय हे 'केस लॉ' म्हणून कायद्याच्या रूपात लागू झाल्याचा इतिहास आहे. तमिळनाडूतील पेचप्रसंगामागील राजकीय पदर पाहता राष्ट्रपती–राज्यपाल यांच्या अधिकारांचा अधिक्षेप होत असल्याचा प्रमुख आक्षेप यामागे दिसतो.

आपल्या अधिकारांबाबत जागरूकता महत्त्वाची आहेच; पण विधेयकांवर अनिश्चित काळ बसून राहण्याने संबंधित लोकनियुक्त सरकार आणि विधिमंडळांच्या अधिकारांवर गदा येते, याचे काय? सर्वांत महत्त्वाचे म्हणजे राष्ट्रपतींनी किंवा राज्यपालांना विधेयकांवर निर्णय घेण्यास कालमर्यादा घालून दिली, तर काही बिघडले का? घटनात्मक पदांच्या अधिकारांच्या संकोचाव्यतिरिक्त त्याचे काही दुष्परिणाम होतात का, किंवा नैतिकता व नैसर्गिक न्यायाच्या कसोटीवर हे योग्य झाले की अयोग्य; हे प्रश्नही कोणी तरी विचारले पाहिजेत. दोन्ही स्तंभांचा हा संघर्ष अनावश्यक वाटला, तरी अशा मंथनातून घटनात्मक बाबींविषयी येणारी स्पष्टता लोकशाही परिपक्व होण्यासाठी उपयुक्तच ठरेल, हे मात्र निश्चित.

## पान १ वरून...

**अवैध गाळ उपशाच्या ...**

होऊन पुन्हा तेच दिवसं या भागातील लोकांना बघायला मिळणार यामुळे या रस्त्यावरील अवैध गाळ उपसा बंद करून प्रशासनाने या टिप्परवर कारवाई करावी अशी मागणी नागरिकांतुन होत आहे.

आठ टनापेक्षा जास्त वजनाच्या वाहनाला वाहतुकीसाठी परवानगी देऊ नये.

प्रधानमंत्री ग्राम सडक योजने अंतर्गत छक्र४८उ ते धुनकवाड नं.१–धुनकवाड नं.२–उपळी रस्ता ता. वडवणी/धारूर साई कन्स्ट्रक्शन कंपनी मार्फत प्रगतीपथावर आहे.सदर रस्त्याचे डांबरी काम पुर्ण झाले आहे हा रस्ता ग्रामीण रस्ता असून या रस्त्याची वजन सहन करण्याची क्षमता आठ टन आहे.तरी जास्त वजनाचे वाहन (टिपर) वाहतुक झाली तर रस्ता खरब होण्याची शक्यता आहे तरी प्रशासनाने याची दखल घ्यावी असे पत्र महाराष्ट्र ग्रामीण विकास यंत्रणा या कार्यालयानी धारूर व वडवणी तहसीलदारांना दिले आहे.

ग्रामस्थ आंदोलन करण्याच्या पावित्र्यात.

गेल्या अनेक वर्षापासून ह्या रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाली होती परंतु ह्या रस्त्यासाठी निधी मंजूर करून हा रस्ता करण्यात आला आहे.तरी या रस्त्यावरून अवैध गाळ उपशाचे टिप्पर मोठ्या प्रमाणात चालत असून हा रस्ता लवकरच खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही म्हणून जर प्रशासनानं हा अवैध गाळ उपशाचे टिप्पर बंद नाही केले तर उपळी व धुनकवाड नं.२ येथील ग्रामस्थ आंदोलन करण्याच्या पावित्र्यात आहेत.

**सीसीटीव्ही सारख्या नवीन...**

असून जिल्ह्यातील कायदा आणि सुव्यवस्थे बाबत समाधानकारक वातावरण आहे. विविध पोलीस स्टेशन मध्ये आयोजित केलेल्या बैठकीतून चांगल्या सूचना मिळत आहेत. त्यापैकी वाहतूक विभागाच्या सूचना या तांत्रिक बाबीवर अवलंबून असल्यामुळे बीडच्या पथकात द्वारे तालुक्यामध्ये जाऊन वाहतुकीचे नियम समजून सांगणार आहोत. समाज माध्यमांवर पोलीस विभागाचे चांगले लक्ष असून समाज विघातक पोस्ट वर पोलिसांचे लक्ष आहे. आम्ही गेल्या काही दिवसात अनेक गुन्हे याबाबत दाखल केले आहेत.

महाविद्यालयीन विद्यार्थिनींच्या बाबत तक्रारी करण्यासाठी मुली पुढे येत नाहीत त्यासाठी मी पोलीस अधीक्षक या नात्याने क्यूआर कोड प्रसिद्ध केला आहे त्या

# डॉ.विजय बारीकराव बलाढ्ये कर्मवीर भाऊराव पाटील शिक्षणरत्न पुरस्काराने सन्मानित

केज/प्रतिनिधी

काव्यमित्र संस्था पुणे यांच्या वतीने आयोजित जागतीक मातृ दिन, छत्रपती संभाजी महाराज जयंती, कर्मवीर भाऊरावपाटील जयंती व समाजसेवक तथा विचारवंत संजय संघवई यांच्या स्मृति दिनाचे औचित्य साधून समाजात उल्लेखनीय कार्य करणार्या विविध क्षेत्रातील व्यक्तींना आदर्श माता,कार्यक्षेत्र उद्योजक,कर्मवीर भाऊराव पाटील शिक्षण रत्न पुरस्कार आणि राष्ट्रीय सेवागौरव पुरस्कार व जात काही जात नाही...का! आणि आठवणींच्या हिंदोळ्यावर पुस्तकांचे प्रकाशन तारांगण सभागृह पिंपरी चिंचवड सायन्स पार्क या ठिकाणी रविवार दिनांक ११ मे २०२५ रोजी सकाळी अकरा वाजता देवून सन्मानित करण्यात आले.डॉ विजय बलाढ्ये यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.या कार्यक्रमाचे अध्यक्ष जेष्ठ कवी व साहित्यिक डॉ.सुरेश वाकचौरे,डॉ.अशोक साळुंके,श्रीमंत संभाजी राजे जाधवराव, साहित्यिक तरकसे तसेच काव्यमित्रसंस्थेचे अध्यक्ष राजेंद्र सगर तसेच उपाध्यक्ष साहित्यिक डॉ.संजय जगताप,सचिव हरिनाथ कांबळे हे उपस्थित होते सर्व मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व ग्रंथ पूजन करुनकार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले

डॉ. विजय बारीकराव बलाढ्ये यांनी त्यांचे पहिली ते सातवी शालेय शिक्षण बीड जिल्हयातीलअंबेजोगाई तालुक्यातील देवळा या गावामधून पूर्ण केले. त्यांची घरची परिस्थिती जेमतेम व हलाखीची असल्यामुळे त्यांनी पुढील आठवी ते दहावी धशिक्षण महाराष्ट्र विद्यालय बनसारोळा, ता.केज,जिल्हा बीड येथे वसतिगृहामध्ये राहून पूर्ण केले.त्या नंतर त्यांनी त्यांचे पुढील अकरावी ते बी.एस.सी शिक्षण योगेश्वरी महाविद्यालय अंबेजोगाई येथून प्रथम श्रेणी मधून पूर्ण केले. घरची परिस्थिती नसतानाही आपल्या दोन भावांना घेवून डॉ. विजय औरंगाबाद येथे उच्च शिक्षणासाठी गेले. त्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातुन एम एस सी आणि पीएचडी उच्च शिक्षण घेतले.ते प्रोटीओमाईस विषया मध्ये संशोधन करणारे महाराष्ट्रातील प्रथम संशोधक आहेत आणि ते त्यांच्या देवळा गावा मधील पाहिले बीएससी एमएससी व पीएचडी करणारे एकमेव आहेत. डॉ.विजय यांचा स्वभाव अगदी मनमिळावू, प्रामाणिक,सर्वांना सहकार्य करण्याचा, सर्वांनाचांगले मार्गदर्शन करणे,बहुजनांतील विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्व पटवून देवून त्यांना सहकार्य करणे इत्यादी.त्यांनी सर्वजाती धर्मांतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून समाजामध्ये शिक्षणाचे महत्त्व पटवून देवून जनजागरणाचे कार्य करत आहेत.त्यांनी त्यांच्या उच्च शिक्षणा नंतर ज्ञानदानाचे कार्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मिलिंद महाविद्यालयातून सुरू केले.त्यानंतर अहमद



नगर येथील न्यू आर्टस्, कॉमर्स ऍण्ड सायन्स कॉलेज मध्ये २.५ वर्ष अध्यापनाचे कार्य केले. त्यानंतर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठा मधील जैवमाहीतीशास्त्र विभागामध्ये गेले पंधरा वर्षापासून अध्यापनाचे कार्य करत आहेत. त्यांचा हा शिक्षणाचा केलेला संघर्ष पाहिला असता आणि त्यांची शैक्षणिक,सामाजिक आणि देशप्रेम पाहता काव्यमित्र संस्थेने त्यांना मानाचा असलेला कर्मवीर भाऊरावपाटील शिक्षणरत्न पुरस्कार देऊन सन्मानित केले. काव्यमित्र संस्थेने या व्यतिरिक्त समाजात उल्लेखनीय कार्य करणार्या विविध क्षेत्रा तील व्यक्तीना आदर्श माता,कार्यक्षेत्रउद्योजक,कर्मवीर भाऊराव पाटील शिक्षणरत्न पुरस्कार आणि राष्ट्रीय सेवागौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले पुस्तक प्रकाशन आणि पुरस्कार वितरण कार्यक्रम अगदी हर्षोल्हासात पार पडला काव्यमित्र संस्थेच्या वतीने कार्यक्रमाचे सूत्र संचालन डॉ.प्रतिमा कांबळे व कवयित्री लांडगे यांनी केले.




# शिरूर तालुक्यातील मदमापुरी येथे वीज पडून १ गाय ठार

मानूर ।प्रतिनिधी

दिनांक १६ मे रोजी दुपारी शिरूर कासार तालुक्यात झालेल्या अवकाळी पावसाच्या वेळी मौजे मदमापुरी शिवारातील सुधाकर उर्फ बंडू शिंदे यांची गाय झालेल्या पावसात वीज पडून मयत झाली आहे. तलाठी राहुल सानप यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला आहे. अलीकडच्या काळामध्ये अवकाळी पावसामध्ये वीज पडून व्यक्ती किंवा जनावरे मयत होण्याचे प्रमाण वाढले आहे. तरी अवकाळी पावसाचे वातावरण निदर्शनास आल्यास सर्व नागरिकांनी स्वतःची सुरक्षितता बाळगावी, तसेच अलीकडच्या काळामध्ये पशुधन कमी होत असून त्यांची सुरक्षितता पाहणे आवश्यक आहे तरी आपली गुरेढोरे सुरक्षित ठिकाणी बांधावीत तसेच पावसाची शक्यता निदर्शनास आल्यास ती सुरक्षित गोठ्यात बांधावीत.

# शिरूर कासार येथे श्रध्दांजली व सद्भावना रॅली !

मानूर ।प्रतिनिधी

पहेलगाम मधे झालेल्या अतिरेकी हल्यात निष्पाप पर्टकांचा बळी घेतलेल्या घटनेचा बदला म्हणून सिंदूर ऑपरेशच्या माध्यमातून भारतीय सैनिकांनी पाक अतिरेक्यांना सडैतोड उत्तर दिले मात्र दुर्दैवाने यातही काही सैनिकाना आपल्या प्राणाची आहूती द्यावी लागली . निष्पाप बळी गेलेले पर्टटक ,लढ्यात शहीद झालेल्या भारतीय जवानांना श्रद्धांजली व भारतीय सैनिकांचे मनोबल वाढवण्यासाठी शिरूरमधे भाजपा मटक्या विमुक आघाडीच्या युवती प्रदेशाध्यक्षा ॲड भाग्यश्री ढाकणे व सामाजिक कार्यकर्ते अदिनाथ गवळी यांचे माध्यमातून या रॅलीचे आयोजन केले होते ,बसस्टडच्या आवारात भारतमातेच्या प्रतिमेला मा.सैनिक अशोक गिरी यांचे हस्ते




पुष्पहार अर्पण करण्यात आला,यावेळी पत्रकार संघाने श्रध्दांजली अर्पण केली,शिवसेनेचे तालुका प्रमुख सोपान मोरे,,वारणीचे ज्ञानदेव केदार ,एम एम बडे ,योगिता गवळी , गोकुळ पवार ,जगदिश चेमटे ,सावळेराम जायभाये ,आदीसह मा.सैनिक सहभागी होते ,भाग्यश्री ढाकणे यांनी रॅलीच्या माध्यमातून सैनिकाप्रती आदरभाव व्यक्त केला .छोट्या मुलीच्या डोळ्यात अश्रू!

अगदी दहा बारा वर्षाची शालेय विद्यार्थीने यावेळी हातात तिरंगा घेऊन भावना व्यक्त केल्या यावेळी तीच्या डोळ्यातील अश्रूने रॅलीमधील

## पान १ वरून...

क्यूआर कोड चा फोटो काढून माहिती पाठवायची आहे. ही माहिती अत्यंत गोपनीय ठेवण्यात येईल. अगदी माझ्या सहकार्याला देखील याबाबत माहिती दिली जाणार नाही. केवळ मला एकट्याला ही माहिती मिळणार असल्यामुळे आपण निश्चिंतपणे कार्यवाही करू त्यासाठी पोलीस स्टेशनला जाण्याची गरज नाही. बीडला एसपी ऑफिसला जाण्याची गरज नाही, घरी बसून तुम्ही ही तक्रार करू शकता २४ तास यासाठी यंत्रणा सुरू आहे. प्रत्येक तक्रारीची मी स्वतः दखल घेत आहे. त्यामुळे या क्यूआर कोड चा जास्तीत जास्त वापर करावा असे आवाहन करून ते पुढे म्हणाले की, नागरिकांनी जास्तीत जास्त नवीन तंत्रज्ञानाचा वापर करावा. बिल्डिंग बांधण्यासाठी आपण लाखो रुपये खर्च करतो त्याचवेळी स्वतःच्या संरक्षणासाठी अल्प खर्चात असलेले सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत आणि एक कॅमेरा समाजासाठी रस्त्यावर बसवावा त्याचा उपयोग तुमच्या स्वतःसाठी आणि पोलीस विभागाच्या पुढील तपासासाठी विशेषतः गुन्हेगारांना शिक्षा देण्यासाठी फायदेशीर होईल. त्यामुळे सीसीटीव्ही जास्तीत जास्त बसवण्यावर नागरिकांनी भर द्यावा असे सांगितले. नुकत्याच झालेल्या ऑपरेशन सिंदूर वेळी सर्व भारतीय आपण एक संघ राहिलोत. त्याचप्रमाणे प्रत्येक नागरिकांनी आपल्या स्वतःच्या स्वार्थासाठी कायदा बिघडेल असे कृत्य करू नये. प्रत्येकाने आपापली जबाबदारी स्वीकारली पाहिजे.

या बैठकीला उपस्थित असलेल्या सर्वांना उद्देशून पोलीस अधीक्षकांनी आपण समाजातील क्रीम असल्यामुळे आपण सामाजिक जबाबदारी स्वीकारली पाहिजे. आपण आपल्या गावाला, तालुक्याला आणखी दहा वर्षांनी किती प्रगती करावयाची आहे हे प्रत्येक नागरिकांनी ठरवले पाहिजे. त्यानुसार प्रत्येकाने आचरण करावे. पोलीस स्टेशनचे अधिकारी कोणत्याही राजकीय दबावाला बळी पडत नाहीत असे वातावरण सध्या जिल्ह्यामध्ये आहे. पोलीस स्टेशन मधील ठाणे अंमलदारांना नवीन कामकाजाबाबत प्रशिक्षण देण्यात येईल, जेणेकरून ठाण्यात येणाऱ्या प्रत्येक तक्रारदाराची तात्काळ दखल घेण्यात येईल. यासाठी पोलीस अधीक्षक कार्यालयाद्वारे लवकरच प्रशिक्षण आयोजित करू असेही त्यांनी सांगितले. या बैठकीमध्ये चांगल्या सूचना आल्या असून त्याबाबत येत्या काही दिवसात निश्चितपणे सूचनेप्रमाणे कार्यवाही झालेली दिसेल असे आश्वासन त्यांनी शेवटी दिले.

या बैठकीमध्ये पाटोदा येथील सामाजिक कार्यकर्ते सय्यद साजेदभाई पेंटर, संदीप जावळे, कडा येथील सामाजिक कार्यकर्ते अनिल ढोबळे, पत्रकार डॉ. विनोद ढोबळे, प्रा. मुस्ताक पानसरे, सूरज शिंदे, जेष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे यांनी पोलीस विभागाच्या वतीने करावयाच्या सूचना मनोगताद्वारे व्यक्त केल्या तर आष्टी येथील ड. वाल्मीक निकाळजे यांनी आष्टी तालुक्यातील खडकत येथील घटनेबाबत गांभीर्याने लक्ष द्यावे असे सांगत तेथील काही अपप्रवृत्ती सामाजिक विद्रोह पसरवत आहेत. त्याचा बारकाईने तपास करून त्यांचे विरुद्ध कायदेशीर कार्यवाही करावी अशी अपेक्षा व्यक्त केली. त्यावर पोलीस अधीक्षकांनी याबाबत अत्यंत बारकाईने तपास करू असे आश्वासन दिले आणि सूचना दिल्या आहेत त्यांची निश्चितपणे अंमलबजावणी करण्यात येईल असे आश्वासन पोलीस अधीक्षकांनी दिले. यावेळी आष्टीचे पोलीस निरीक्षक शरद भुतेकर यांनी प्रास्ताविक केले. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पोलीस मित्र संघटनेचे जिल्हाध्यक्ष अनंतदेवा जोशी यांनी तर आष्टीचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विक्रांत हिंगे यांनी आभार मानले. या बैठकीसाठी आष्टीचे सामाजिक कार्यकर्ते माजी उपनगराध्यक्ष सुनील रेडेकर, शेरी खुर्द येथील सरपंच संजय थोरवे, कडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक अशोक पवार, कडा येथील ग्रामपंचायत सदस्य बिपीन भंडारी, दीपक उंबरकर, माजी पंचायत समिती सभापती गौतम सावंत, इम्रान पानवाले इत्यादी उपस्थित होते.

**कासारी येथे ....**

सुद्धा हजारो प्रेक्षकांनी मैदानाच्या दुतर्फा गर्दी केली होती. कोणत्याही बैलगाडा मालकावर अन्याय होऊ नये म्हणून संयोजकांनी अचूक निर्णय व्हावा यासाठी खास

## पान १ वरून...

लाईव्ह व्हिडिओ ग्राफीची व्यवस्था केली होती.

यावेळी धाकलगावच्या पक्षा – पिस्टन बैलजोडीने रोमांचकारी विजय मिळवला. याकुब भाई पिंपळगाव च्या पुष्पा–भारत बैलगाडा द्वितीय, श्रीधर बाबुराव बडे, कासारी यांची लक्षा–बादशहा बैलजोडी तृतीय, ओमसाई प्रसन्न,छ.संभाजीनगरची राणा–सर्जा चौथा, सती सामंत पाचवा, परमेश्वर काकडे बालानगर, रेणुका माता प्रसन्न देवीदेगांव, जय हनुमान प्रसन्न आंबड या बैलजोड्या सहाव्या क्रमांकावर समान राहत विजय मिळवला.

विजयी बैलगाडा मालकांना जयसिंह सोळंके, भरत नागरगोजे, नामदेव नागरगोजे,श्यामसुंदर बडे, बालाजी घुले,राजु सय्यद, दिपक मोरे,प्रशांत उघडे, जमीर पटेल सय्यद आदी मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. सर्व रोमांचकारी सामन्यांमध्ये उपस्थित मंत्रमुग्ध झाले होते.विजयी बैलगाडा मालकांनी मैदानावर गुलाल उधळत आनंदोत्सव साजरा केला. कासारी ग्रामस्थांनी स्पर्धेचे चोख नियोजन केले होते. चित्रफित द्वारे अचूक निकाल देण्यात आला. बैलगाडा शर्यत यशस्वी करण्यासाठी आयोजक राजेंद्र बडे, दादासाहेब बडे,दत्ता केंद्रे, प्रशांत बडे, ऋषी बडे, बाबा शेख, विठ्ठल बडे, समाधान बडे, गोरक्षनाथ बडे,बाजीराव उघडे, चंद्रवदन घुले,संभाजी फड, बप्पा बडे, गणेश बडे ,प्रकाश घुले, तुकाराम बडे ,मैदान मालक नितीन बडे सह गावातील सर्व तरुण कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. झेंडा पंच म्हणून निलेश बोरगांवकर यांनी काम केले.स्पर्धेचे समालोचन अशोक खेत्रे व ऋषी सुरनर पहाडी आवाजात केले.

# न्यू हायस्कूल दावरवाडी शाळेचा निकाल (९५.०० )टक्के

पैठण (प्रतिनिधी)

पैठण तालुक्यातील दावरवाडी येथील उच्च माध्यमिक न्यू हायस्कूल दावरवाडी शाळेचा एसएससी बोर्ड परीक्षेचा ९५.०९ टक्के निकाल लागला आहे दावरवाडी न्यू हायस्कूल शाळेतील गुण मिळवणारी विद्यार्थिनी प्रथम–कु.प्रीती हरिचंद्र भवरे ९६.६० टक्के २) कु.श्रावणी विठ्ठल गव्हाणे –९४.४० टक्के ३) भाग्यश्री बाबासाहेब काळे –९३.२० टक्के प्रथम आलेल्या मुलींचा न्यू हायस्कूल शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला एकूण प्रविष्ट विद्यार्थी संख्या –१६३ पैकी १५५ विद्यार्थी पास झाले आहे प्रथम आलेल्या मुलींचा शाळेय समिती अध्यक्ष श्याम तांगडे शालेय समिती सदस्य प्राचार्य गोजरे सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे स्वागत केले

## सरस्वती इंग्रजी माध्यमाच्या शाळेचा निकाल शंभर टक्के

देगलूर ।. प्रतिनिधी

देगलूर : येथील सरस्वती विद्यालय या इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील दहावी शालांत परीक्षेचा निकाल शंभर टक्के लागला आहे. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी विद्यालयाने शालांत परीक्षेतील यशाची परंपरा कायम राखली आहे. यावर्षी विद्यालयातील ९०% पेक्षा अधिक गुण घेणारे १७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. . ९०% पेक्षा अधिक गुण घेणारे विद्यार्थ्यात ऋतुजा मगर ९७.८०%, आयुष कोडगिरे ९७ %, ओमकार मळगे ९६% ,अथर्व ताटे ९६%, सय्यद इब्राहिम ९५.८०%, श्रेया नागठाणे ९५.८०% ,स्वराज कोलगिरे ९५.६०%, प्रसाद कदम ९५% ,प्रशांत धडेवार ९३.२०%, प्रबोध शिळवणीकर ९३% ,प्रज्वल ध्याडे ९२.४५ %, विश्वदत्ता देशमुख ९२.२०%, प्राप्ती पाटील ९१. २५ % सिद्धी अरमान ९०.८० % पृथ्वीराज थडके ९०.४०%, श्रीयांश मेरगेवार ९०.२०% या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे सेक्रेटरी के. भारती, कोऑर्डिनेटर बी उदयराज, मुख्याध्यापक एस. मरतोळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

# उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या धडाकेबाज पुढाकारामुळे बीड, नांदेड, संभाजीनगरमध्ये 'सीट्रिपलआयटीना मंजूरी

## मराठवाड्यात २१ हजार युवकांना मोफत कौशल्य प्रशिक्षण देऊन उद्योगपुरक वातावरण निर्माण करण्यासाठी दमदार पाऊल

मुंबई (प्रतिनिधी)

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मराठवाड्याच्या विकासावर लक्ष केंद्रीत केले असून त्यांच्याच पुढाकारामुळे बीड जिल्ह्यानंतर आता नांदेड आणि छत्रपती संभाजीनगर या दोन जिल्ह्यांसाठी प्रत्येकी एक 'सेंटर फॉर इन्व्हेंशन, इनोव्हेशन, इक्युबेशन अ‍ॅन्ड ट्रेनींग' अर्थात 'सीट्रिपलआयटी' मंजूर करण्यात आले आहेत.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी टाटा टेक्नॉलॉजी कंपनीला पाठविलेल्या पत्राला कंपनीने सकारात्मक प्रतिसाद दिला असून नांदेड आणि छत्रपती संभाजीनगरसाठी दोन प्रशिक्षण केंद्रे मंजूर केल्याचे पत्राद्वारे कळवले आहे. अजित पवार यांनी घोषणा केल्यानंतर अवघ्या दीड महिन्यात मराठवाड्यातील बीड, नांदेड, संभाजीनगर या तीन जिल्ह्यांसाठी तीन 'सीट्रीपलआयटी' मंजूर झाल्याने 'बोलेन ते करेन. ही अजित पवार यांची ओळख अधिक ठळक झाली आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे प्रयत्न आणि टाटा टेक्नॉलॉजीच्या सहकार्याने महिन्यापूर्वी बीडसाठी 'सीट्रीपलआयटी' मंजूर झाले आहे. त्यानंतर आता नांदेड व छत्रपती संभाजीनगरसाठी दोन 'सीट्रीपलआयटी' मंजूर झाल्याने, मराठवाड्यातील युवकांना जागतिक दर्जाचे कौशल्य प्रशिक्षण, उद्योगक्षेत्राला कुशल मनुष्यबळ स्थानिक पातळीवर उपलब्ध होणार आहे. मराठवाड्यात नवउद्योगांना प्रोत्साहन देण्यासह अनेक उद्दीष्टांची यानिमित्ताने पूर्ती होणार आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मराठवाड्याचा विकासावर लक्ष केंद्रीत केले असून त्यांचे सातत्याने मराठवाडा दौरे सुरु आहेत. दि. २३ मार्च २०२५ रोजीच्या मराठवाडा दौऱ्यात नांदेड येथे बोलताना त्यांनी बीड, नांदेड व छत्रपती संभाजीनगर येथे 'सीट्रीपलआयटी' उभारण्याची घोषणा केली होती. दौऱ्यावरुन मुंबईत परतल्यानंतर दि. २५ मार्च २०२५ रोजी तात्काळ टाटा टेक्नॉलॉजी कंपनीला पत्र लिहून या तीन जिल्ह्यांसाठी 'सीट्रीपलआयटी' उभारण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले होते. कंपनीने दीड महिन्यात तिन्ही जिल्ह्यांसाठी 'सीट्रीपलआयटी' मंजूर केल्याची पत्रे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना पाठवून सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. या 'सीट्रीपलआयटी'मुळे मराठवाड्यातील युवकांना औद्योगिक प्रशिक्षण, 'एआय' वापरासह तांत्रिक कौशल्यविकासाची संधी मिळेल.युवकांना उद्योगक्षम बनविणे, रोजगार, स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्यात 'सीट्रीपलआयटी' महत्वाची भूमिका बजावणार आहेत.

'टाटा टेक्नॉलॉजी' कंपनीने उपमुख्यमंत्री अजित पवार यांना पाठविलेल्या पत्रात, नांदेड आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यासाठी प्रत्येकी १९१ कोटी रुपये खर्चून नवीन 'सीट्रिपलआयटी' स्थापन करण्याचा निर्णय घेतल्याचे कळविले आहे. यापैकी १६२ कोटी ६२ लाख रुपये टाटा टेक्नॉलॉजी तर, उर्वरीत रक्कम राज्य शासन आणि संबंधित जिल्हा प्रशासन देणार आहे. नव्या सेंटरमधून दरवर्षी ७ हजार युवकांना प्रशिक्षित केले जाईल, त्यातून मराठवाड्यात उद्योगपुरक वातावरण निर्माण होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. 'टाटा टेक्नॉलॉजी' कंपनीने 'सीट्रिपलआयटी' स्थापन केल्यानंतर दरवर्षी प्रत्येकी ७ हजार प्रमाणे मराठवाड्यातील २१ हजार युवकांना उद्योगांच्या (४.०) गरजेनुसार आवश्यक जागतिक दर्जाचे औद्योगिक, तांत्रिक प्रशिक्षण दिले जाणार आहे. यामुळे उद्योगांना प्रशिक्षित मनुष्यबळ मिळेल तसेच युवकांना त्यांच्या इच्छेप्रमाणे रोजगार मिळवणे, स्वयंरोजगार करणे शक्य होणार आहे.

'सीट्रिपलआयटी'च्या स्थापनेनंतर पहिल्या तीन वर्षांसाठी प्रशिक्षण खर्च 'टाटा टेक्नॉलॉजी' उचलणार आहे. त्यानंतर प्रशिक्षणाचा खर्च 'टाटा टेक्नॉलॉजी' आणि जिल्हा प्रशासन दरवर्षी प्रत्येकी पन्नास टक्क्यांप्रमाणे विभागून करणार आहेत. यामुळे नांदेड, छत्रपती संभाजीनगर, बीड जिल्ह्यांसह मराठवाड्यातील हजारो युवकांना उद्योगक्षेत्राच्या गरजेप्रमाणे औद्योगिक, तांत्रिक प्रशिक्षण मिळेल. त्यांची कौशल्यवृद्धी होईल. उद्योगांना प्रशिक्षित मनुष्यबळ मिळेल. यातून जिल्ह्यात उद्योगपुरक वातावरण निर्माण होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या धडाकेबाज, निर्णयक्षम कार्यपद्धतीबद्दल मराठवाड्यातील नागरिकांकडून आनंद, समाधान व्यक्त करण्यात येत आहे.



# जिजाऊ इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल जाफ्राबाद निकालाची परंपरा कायम

जाफ्राबाद (प्रतिनिधी)

जिजाऊ इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल जाफ्राबाद ता. जाफ्राबाद जि.जालना येथील मार्च २०२५ ड.ड.उ परिक्षाचा निकाल यावर्षीही - १००% विशेष प्राविण्य प्राप्त विद्यालयातील विद्यार्थी सी.बी.एस. सी. बोर्ड १) प्रथम क्रमांक :- विठ्ठल किसन गायकवाड ९१.४०% २) द्वितीय क्रमांक :- ८९.२०% ३)तृतीय क्रमांक:- ८९.००% स्टेट बोर्ड १) प्रथम क्रमांक :- शेख राहत फारुख -८७.२० % २) द्वितीय क्रमांक - शेख अमन नूर - ८५.६०% ३) तृतीय क्रमांक - चव्हाण भागवत भानुदास८३.००% हे त्यांच्या शैक्षणिक जीवनातील एक अत्यंत गौरवशाली यश आहे आणि संपूर्ण शाळेसाठी अभिमानाची बाब आहे. या उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे जिजामाता ग्रामीण विकास शिक्षण संस्थेच्या व शाळेच्या संस्थापक अध्यक्षा डॉ. सुरेखाताई लहाने ,संजयजी लहाने ,प्राचार्य योगेश आर. शिंपी ,आर. जी.धारकर, व्ही. डब्ल्यू. दुनगहू एन.आर.खान तसेच संपूर्ण शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्याकडून पुष्पगुच्छ व शाल श्रीफळ देऊन मन:पूर्वक अभिनंदन करण्यात आले आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी जिजामाता ग्रामीण विकास शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# दहावीच्या परीक्षेत पृथ्वीराज यादव ९०.०२टक्के घेऊन झाला उत्तीर्ण



वडवणी/प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ,संभाजीनगर यांच्या वतीने घेण्यात आलेल्या फेब्रुवारी / मार्च २०२५ च्या दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल काल मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरून जाहीर झाला. यात धुनकवाडचे सुपुत्र व गुरुकुल इंग्लिश स्कूल बीड येथीलउइडउ पॅटर्नचे विद्यार्थी चि. पृथ्वीराज राम यादव हा ९०.०२% गुण घेत उत्तीर्ण झाला. विशेष म्हणजे वडिल राम यादव हे पोलिस दलात कार्यरत आहेत तर आई संगिता यादव ह्या कृषी विभागात नोकरीला आहेत.आई-वडिलांना दोघांनाही नोकरीमुळे आपल्या मुलाकडे लक्ष देण्यासाठी वेळ नाही परंतु पृथ्वीराज यादव याने उइडउ पॅटर्न इयत्ता दहावी मधुन कोणत्याही प्रकारचे कोचिंग क्लासेस न लावता प्रॅक्टिकली अभ्यास करून स्वाताहाच्या हिमतीने खडतर परिश्रम जिद्द चिकाटीच्या आणि आत्मविश्वासाच्या बळावर ९०.०२% गुण घेऊन उत्तीर्ण होऊन हे यश प्राप्त केले. त्यांच्या या यशाबद्दल भाजपा प्रवक्ते राम कुलकर्णी,धुनकवाडचे सरपंच भागवत गव्हाणे,माजी सरपंच अरुणराव यादव, माजी सरपंच अभिमान यादव,प्रा.नवनाथ यादव बीड,प्रा.रवी गोरे,पंढरीनाथ म्हेत्रे सर, दीपक राऊत सर ,धर्मराज शिंदे सर अनुसे सर,डॉ.पवन म्हेत्रे,पत्रकार जगदीश गोरे, अशोक मुळे,ज्ञानेश्वर यादव,उपसरपंच राम यादव,दत्तात्रय गोंदणे यांच्यासह मातोश्री कॉलनी बीड येथील व धुनकवाड येथील मित्रपरिवार नातेवाईक यांनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.

# जीवन शिक्षण माध्यमिक विद्यालयाचा दहावीचा ९८ टक्के निकाल गौरवशाली यशाची परंपरा कायम

केज ।प्रतिनिधी

केज शहरातील जीवन शिक्षण माध्यमिक विद्यालयाचा इयत्ता दहावीचा निकाल मार्च - २०२५ चा एकूण निकाल ९८ % एवढा लागलेला असुन शिक्षण क्षेत्रात उत्कृष्टतेचा नवा उच्चांक गाठला आहे. मार्च - २०२५ मध्ये झालेल्या माध्यमिक शालांत परीक्षेत जीवन शिक्षण विद्यालयाने घवघवीत यश संपादन केले.शाळेतील ११३ विद्यार्थ्यांपैकी १११ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन संस्थेचा निकाल ९८ % एवढा लागला आहे. शाळेतील गुणवंत विद्यार्थी पुढीलप्रमाणे आहेत प्रथम क्रमांक कु.धनगौरी विकास जाधव व कु.आदिबा सियामोद्दीन इनामदार -९४.६०%,द्वितीय क्रमांक चि.धनराज गोरख मैंद ९३.८०%, तृतीय क्रमांक चि. हनुमंत शिवाजी दराडे व कु.आर्या भास्कर केदार-९३.६०% तसेच ९०% पेक्षा अधिक गुण असलेले १७ विद्यार्थी, ८०% पेक्षा अधिक गुण घेतलेले ४१ विद्यार्थी (विशेष प्राविण्य) व ७०% पेक्षा अधिक गुण घेतलेले २७ विद्यार्थी (प्राविण्य)व प्रथम श्रेणी १७ विद्यार्थी,उत्तीर्ण श्रेणी १९ विद्यार्थी आहेत.संस्थेच्या वतीने विशेष अभिनंदन करत सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे आणि पालकांचे सचिव श्री. हारूणभाई इनामदार, सहसचिव यासीनभाई इनामदार,मुख्याध्यापक रमाकांत ढाकणे,प्राचार्य श्री.दत्ता हंडीबाग, सहाय्यक मुख्याध्यापक श्री.संदीप गुळवे,बन्सल क्लासेसचे



श्री.गोविंद ठोंबरे,अस्थिव्यंग विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. विनायक ठोंबरे यांनी अभिनंदन केले आणि सर्वांना पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या आहेत.तसेच इतर मान्यवरांच्या हस्ते अभिनंदन करण्यात आले आहे.जीवन शिक्षण विद्यालयात गुणवत्तापूर्ण शिक्षण व यशस्वी भविष्याची हमी राबवून भविष्यातील विद्यार्थी घडविण्याचे कार्य जीवन शिक्षण विद्यालयात सातत्याने चालू आहे असे मुख्याध्यापक रमाकांत ढाकणे यांनी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

# महात्मा फुले स्मारक समिती तर्फे छत्रपती संभाजी महाराजांची जयंती साजरी

## छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्यापूढे शत्रूही नतमस्तक झाले - डॉ.किरण चक्रे

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

ज्यांच्या पराक्रमाने स्वराज्याची धुरा छत्रपती शिवाजी महाराजांच्या नंतर तेवढ्याच प्रेरणेने आणि ताकदीने चालविली गेली अशा पराक्रमी, तेजस्वी, स्वराज्याच्या धाकल्या धन्याने केवळ नऊ वर्षांत आठ शत्रूंबरोबर एकही लढाई हरली नाही असे पराक्रमी राजे म्हणजे छत्रपती संभाजी महाराज होते असे वक्तव्य प्रा.डॉ.किरण चक्रे यांनी केले.

महात्मा फुले स्मारक समिती तर्फे आयोजित छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त ते प्रमुख व्याख्याते म्हणून स्मारक स्थळी आयोजित अभिवादन सभेत बोलत होते. यावेळी विचारमंचावर सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ तथा स्मारक समितीचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले हे होते. पुढे बोलताना डॉ.चक्रे यांनी शिवपूर्वकालीन, शिवकालीन आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्यानंतर घडलेल्या इतिहासाची सांगड घालत संपूर्ण घडामोडी उपस्थित शिवप्रेमी, शंभूराजे प्रेमी नागरिकांना उलगडून दाखवत प्रबोधन केले. अध्यक्षीय समारोपात बोलतांना डॉ.राजेश इंगोले यांनी छत्रपती शिवाजी महाराजांनी जीवन आदर्शवत कसं जगायचं ते शिकवलं. तर, छत्रपती संभाजी महाराजांनी स्वराज्यासाठी मरायचं कसं हे उदाहरण जगासमोर ठेवलं. अवघ्या नऊ वर्षांच्या कालावधीत छत्रपती शिवाजी महाराजांनी जेवढे युद्ध लढले तेव्हढेच युद्ध लढून सर्व लढाया जिंकणारा अपराजित योद्धा म्हणजे छत्रपती संभाजी महाराज होते. इतिहासातील सर्वात शापित राजे म्हणून छत्रपती संभाजी महाराज यांचे नांव येईल. कारण, तत्कालीन इतिहासकारांनी संभाजीराजांच्या कारकिर्दीला बदनाम करण्याचेच चुकीचे काम केले. परंतु, ज्यावेळी छत्रपती संभाजी महाराजांच्या खऱ्या इतिहासाचा आधुनिक इतिहासकारांनी शोध घेतला त्यावेळी छत्रपती संभाजी महाराजांच्या कारकिर्दीला तोड नाही असे सर्वांना मान्य करावे लागले असे डॉ.राजेश इंगोले यांनी



सांगितले. छत्रपती संभाजी महाराजांचा जन्ममहोत्सव महात्मा फुले स्मारक समितीच्या वतीने ढगेज क्लासेस मध्ये उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.आदित्य कदम यांनी केले. तर व्याख्याते म्हणून डॉ.किरण चक्रे यांनी विचार मांडले. अध्यक्षीय समारोप अत्यंत प्रभावी व अभ्यासू पद्धतीने डॉ.राजेश इंगोले यांनी केला. तर आभार सुनिल नरसिंगे यांनी मानले. या प्रसंगी संजय साळवे, डॉ.अनिल नरसिंगे, रत्नदीप गोरे, डॉ.मिलींद ढगे, प्रा.आदित्य कदम, भाऊराव गवळी, बि.के.मसने व परिसरातील नागरिकांची उपस्थिती होती.

# जनतेतला नेता: सुरेश धस यांचा साधेपणाचा आदर्श

पाटोदा । प्रतिनिधी

आजच्या राजकारणात जेव्हा बडेजाव, सुरक्षेचे कवच आणि आलिशान गाड्या यांचा बोलबाला असतो, पीएचा ताफाअसतो. मात्र आ. सुरेश अण्णा धस यांनी दाखवलेली साधेपणाची प्रतिमा जनतेच्या मनाला स्पर्शन जाते. एका कार्यक्रमानंतर ते थेट रिक्षामध्ये बसून नागरिकांमध्येच मिसळले. त्यांच्यासोबत इतर कार्यकर्तेही होते.

हा क्षण कुणाच्याही नजरेत भरल्याशिवाय राहणार नाही. कोट-टाय, भारी गाड्या आणि बडेजाव टाळत आ. सुरेश अण्णा धस हे आजही सामान्य जनतेसारखेच वागतात, ही गोष्ट या फोटोद्वारे अधोरेखित होते. त्यांच्या हातातील 'नमस्कार' ही एक कृती नाही, तर एक मूल्य आहे ह्व लोकांबद्दलचा आदर, नम्रता आणि त्यांच्यासोबत एकरूप होण्याची वृत्ती आणि जनतेशी विषयी तळमळ.नेता कसा असावा यावर कितीतरी व्याख्या मांडल्या गेल्या असतील, पण 'सुरेश अण्णा धस' या नावासमोर त्या सर्व व्याख्या फिक्या ठरतात, हे या फोटोतून दिसते.



# वडवणी येथील,आयुष्यमान आरोग्य मंदिरामध्ये राष्ट्रीय डेंग्यू दिनानिमित्त जनजागृती कार्यक्रम संपन्न

वडवणी।प्रतिनिधी

राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम १६ मे राष्ट्रीय डेंग्यू दिन जिल्हा हिवताप कार्यालय,बीड यांच्यावतीने वडवणी येथील, आयुष्यमान आरोग्य मंदिरामध्ये शुक्रवार दि.१६ मे २०२५ रोजी राष्ट्रीय डेंग्यू दिनानिमित्त जनजागृती कार्यक्रम संपन्न. याबाबत अधिक माहिती अशी की,लोकांमध्ये जनजागृती करण्यासाठी दरवर्षी १६ मे रोजी राष्ट्रीय डेंग्यू दिन साजरा केला जातो या दिवशी वेगवेगळे कार्यक्रम आयोजित करून डेंग्यू आजार कशामुळे होतो पावसाळ्यामध्ये या आजाराचं प्रमाण का जास्त असते प्रतिबंधात्मक उपाययोजना काय कराव्यात ज्यामुळे हा आजार होणार

याची माहिती देण्यासाठी कार्यक्रम आयोजित केले जातात या अनुषंगाने वडवणी येथील आयुष्यमान आरोग्य मंदिरामध्ये १६ मे राष्ट्रीय डेंग्यू दिन जनजागृती कार्यक्रम घेऊन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वडवणी येथील,आयुष्यमान आरोग्य मंदिराचे वैद्यकीय अधिकारी डॉ.थटवले साहेब होते तर प्रमुख अतिथी व समुपदेशक म्हणून श्री. नागरे साहेब तसेच आरोग्य सेवक श्री.वाघे साहेब,आरोग्य सेवक गिरी सर,श्री.वारे सर,श्री डुकरे सर,श्रीमती गलधर मॅडम प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी,श्री.चोले सर लॅब असिस्टंट,परिचारिका उजसगरे मावशी यांच्यासह आयुष्यमान आरोग्य मंदिरांमधील सर्व कर्मचारी उपस्थित होते.

या कार्यक्रमांमध्ये रुग्णालयात आलेल्या रुग्ण व त्यांच्यासोबत असलेल्या नातेवाईकांना वेगवेगळे प्रात्यक्षिक दाखवून त्या ठिकाणी



काढलेल्या रांगोळीद्वारे माहिती देण्यात आली एडिस,इजिप्ती हे डास चावल्यास डेंगू हा आजार होतो या डासांची निर्मिती पाणी साठवून राहिल्यास होते त्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून आपल्या घरासमोरचा परिसर स्वच्छ ठेवावा जसे की पाणी साठूनदेणे,टायर कुंड्या, बादल्या,कचरा,प्लास्टिक नारळाच्या करवंटच्या,फुटलेल्या मातीच्या घागरी,नाले गटारी हे स्वच्छ कराव्यात तपासा, स्वच्छ करा आणि झाकून ठेवा:

डेंग्यूला हरविण्याचे उपाय करा.

डेंगू ला आळा घालूया सर्वत्र जागरूकता पसरूया असे घोषवाक्यचे फलक दाखवून रुग्णालयातील रुग्णांची जनजागृती करून १६ मे राष्ट्रीय डेंग्यू दिन साजरा करण्यात आला.

# विजय शहाची मंत्रीमंडळातून हकालपट्टी करा आझाद क्रांती सेना

वडवणी ।प्रतिनिधी

आज दिनांक १५ मे २०२५ रोजी आझाद क्रांती सेनेच्या वतीने महामहीम राष्ट्रपती यांना तहसीलदार मार्फत निवेदन देण्यात आले. कर्नल सोफिया कुरेशी बद्दल मंत्री विजय शहा यांनी अपशब्द वापरले असल्याने मंत्री विजय शहा याची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करून देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा सविस्तर वृत्तांत असे की, ज्या अतिरेक्यांनी आपल्या निष्पाप नागरिकावर गोळीबार करत मारले त्याचा बदला म्हणून भारतीय सैनिकांनी ऑपरेशन सिंदूर राबवत कर्नल सोफिया कुरेशी विंग कमांडर वैदिका सिंग यांनी पाकिस्तानातील दहशतवादी तळावर हल्ले करून दहशतवाद्यांचा समूळ नष्ट केले.अशा जाबाज सैनिकांच्या पराक्रम व शौर्याच्या संपूर्ण देश कौतुक करत असतांना मध्यप्रदेश सरकारमधील भाजपा मंत्री विजय शहा यांनी आम्ही



अतिरेक्यांना मारण्यासाठी त्यांची बहीण पाठवली म्हणत बेताल व बेजबाबदार संताप जनक वक्तव्य करून आपल्या सैनिकांचा अवमान करीत त्यांचं मनोधैर्य खचवण्याचा प्रयत्न केला आहे. अशा मंत्र्याला संविधानिक पदावरती राहण्याचा कुठलाही अधिकार नाही म्हणून महामहीम राष्ट्रपती यांनी विजय शहा याची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करून त्याच्यावरती देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी आझाद क्रांती सेनेच्या वतीने महामहीम राष्ट्रपती यांना तहसीलदारांमार्फत निवेदन देऊन मागणी करण्यात आली आहे याप्रसंगी आझाद क्रांती सेना तालुकाप्रमुख १) महादेव आवाड,अरुण आवाड,कांताबाई इचके,मंगेश शिंदे,लक्ष्मण आवाड,विलास कारके,करण भिसे,महेंद्र डोंगरे,अभिषेक हतागळे,पिंटू अडागळे,नितीन पोटभरे,अविनाश लोंढे यांच्या सह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# शिवाजी हायस्कूल शाळेची उज्ज्वल निकालांची परंपरा कायम

बदनापूर (प्रतिनिधी)

बदनापूर तालुक्यातील गेवराई बाजार शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने शिवाजी हायस्कूल शाळेची स्थापना सन १९६७ मध्ये करण्यात आली शिवाजी हायस्कूल शाळेने दरवर्षी प्रमाणे यंदाही उज्ज्वल निकालांची परंपरा कायम राखली आहे .सदर शाळेचा इयत्ता दहावीच्या बोर्डाच्या परीक्षेचा निकाल ९४.७८% टक्के लागला आहे. शिवाजी हायस्कूल शाळेचे उत्तीर्ण झाले शिवाजी हायस्कूल शाळेचे एकुण ११५ विद्यार्थी दहावीच्या बोर्डाच्या परीक्षेला बसले होते या पैकी १०९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत शिवाजी हायस्कूलचा विद्यार्थी अस्मिता ज्ञानेश्वर कान्हेरे ९२.२० टक्के गुण घेऊन शाळेतुन प्रथम क्रमांक पटकावला आहे. अंजली ज्ञानेश्वर लहाने ९१.८० टक्के गुण घेऊन शाळेतुन द्वितीय क्रमांक पटकावला आहे . तेजस्वी आप्पासाहेब कान्हेरे विद्यार्थ्यांनी









९१.४० टक्के गुण मिळवून शाळेत तृतीय क्रमांक पटकावला आहे. कविता कैलास जाधव या विद्यार्थ्यांने ९१. टक्के गुण मिळवून शाळेत चौथा क्रमांक पटकावला आहे. मुख्याध्यापक श्री विजय वाघमारे आप्पासाहेब मदन, प्रशांत काळे, श्री आर . डी. कान्हेरे , श्री वाय .आर कान्हेरे , व शाळेचे शिक्षकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे . शैक्षणिक गुणवत्ते सोबत सांस्कृतिक कार्यक्रम तसेच इतर उपक्रमातही शिवाजी हायस्कूल दरवर्षी अग्रेसर राहते शाळेच्या वतीने सतत सराव, शिक्षकांचे मौलाचे मागदर्शन भरवशावर यशस्वी झाल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले गुणवंत विद्यार्थ्यांचे संरपच सौ मिराबाई देवकर, माजी सरपंच अशोक सुळे , माजी सरपंच सुरेश लहाने , माजी उपसभापती श्रीराम कान्हेरे , अंबादास कान्हेरे , शिवनाथ कान्हेरे, शिवतेज फाउंडेशनचे अध्यक्ष योगेश लहाने , सचिव हरिश्चंद्र कान्हेरे , उपाध्यक्ष महेश माने, सदस्य गजानन लहाने, किशोर कान्हेरे , रमेश मोरे , योगेश सोरमारे , सुदर्शन कान्हेरे , गजेंद्र लहाने आदी विविध ग्रामस्थांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# आयकॉन पॅराडाईज इंग्लिश स्कूलची शंभर टक्के निकालाची परंपरा कायम......!

## प्रमोद मैंदड ९५.८६% घेऊन प्रथम, सायली लाड ९५ टक्के घेऊन द्वितीय,तर ऋतुजा मुळे ९४.६०% तृतीय



पैठण (प्रतिनिधी)

पैठण येथील विशाल बहुउद्देशीय प्रतिष्ठान संचालित आयकॉन पॅराडाईज इंग्लिश स्कूलचा याही वर्षी शंभर टक्के निकाल लागला असून प्रमोद बप्पासाहेब मैंदड प्रथम क्रमांक मिळविला तर सायली लाड हिने ९५% घेत द्वितीय क्रमांक मिळवला,तर ऋतुजा मुळे हिने ९४.६०% तृतीय क्रमांक मिळवला आहे. फेब्रुवारी २०२५ च्या एस.एस.सी. परीक्षेसाठी आयकॉन पॅराडाईज इंग्लिश स्कूल मधून एकूण ३५ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. पैकी ३३ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह सह उत्तीर्ण झाले. तर दोन विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा विशाल बहुउद्देशीय प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. संतोष पा.तांबे, सचिव मानसी नवथर, उपाध्यक्ष विशाल पा. तांबे, प्राचार्य आर. बी. रामावत, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती एम. के. कोळगे, डॉ.जे. ई. येवले, सौ.एस. एस. धोकटे, पी. बी. पातकळ, एस. सी. औरंगे, बी.आर. पठाण, आर.पी. बोरकर, ऋषिकेश नवथर, अंबरीश गायकवाड यांनी गुणवंतांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.




# साई मॉडर्न इंग्लिश स्कूल बदनापूर च्या १० वी च्या उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम

**बदनापुर-(प्रतिनिधी)**

**साई मॉडर्न इंग्लिश स्कूल च्या शै.वर्ष २०२४-२५ बॅच चा इयत्ता १० वी च्या सर्व विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले.यंदाच्या दहावीच्या परीक्षेत साई मॉडर्न इंग्लिश स्कूल येथून एकूण ४७ विद्यार्थी परीक्षेला बसले होते व पैकी ४६ विदयार्थी चांगले गुण घेऊन पास झाले आहेत. त्यातून १) प्रतिक राजेश जोशी - ९३ % प्रथम २) अर्जुन विष्णू जावळे -९२.८०% व्दितीय**

३) बादल संजय घुनावत आणि जुनेद हज्जू शेख दोन्ही ८८.२०% गुण घेऊन तृतीय आले.शाळेचा एकुण निकाल ९७.७% लागला. सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शक व निवृत्त पोलीस अधिकारी मा.श्री बळीराम गिते,संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. गजानन गिते सर , तसेच संस्थेच्या सचिव सौ. सुनिता ताई बळीराम गिते , शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.करुणा जाधव , उपमुख्याध्यापिका शेख आफरिन, सर्व शिक्षक यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि त्यांना त्यांच्या भावी उच्च शिक्षणासाठी व उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# दावरवाडी येथे प्रथम वर्ष श्राद्ध निमित्त भागवत कथेचे आयोजन....!

पैठण (प्रतिनिधी)

दावरवाडी येथील श्रीमद् भागवत कथा व ज्ञानयज्ञ सोहळा व प्रथम वर्षश्राद्ध असल्याने भागवत कथेचे नियोजन करण्यात आले आहे बबनराव गंगाधर वाघमोडे राजेंद्र गंगाधर वाघमोडे



जिल्हा नियोजन समिती छत्रपती संभाजीनगर सोसायटी चेअरमन यांच्या मातोश्री कै ग.भा. पार्वती बाई गंगाधर वाघमोडे यांच्या प्रथम पुण्यस्मरणार्थ श्रीमदभागवत कथा व ज्ञानयज्ञ सोहळा भागवत चार्य ह भ.प भाऊसाहेब महाराज जोशी (राजपिंपरीकर) शेवट सांगता होईल ह भ.प बाळू महाराज गिरगावकर यांचे शेवटच्या दिवशी कीर्तन होईल सात दिवस श्रीमद् भागवत कथा राहणार आहे दावरवाडी येथील श्रीराम मंदिरामध्ये कथेचे नियोजन ठेवले आहे पहिल्या दिवशी शेकडो पुरुष व महिला यांनी कथा ऐकण्यासाठी हजेरी लावली होती

# आमदार नारायण कुचे यांच्या उपस्थितीत अंबड शहरात ऑपरेशन सिंदूर

## राबविणाऱ्या भारतीय सैन्य दलाला समर्थनार्थ तिरंगा रॅलीस उस्फूर्त प्रतिसाद

अंबड (प्रतिनिधी)

बदनापुर अंबड मतदार सघाचे आमदार नवनिर्वाचीत भाजपा ग्रामीण जालना जिल्हाअध्यक्ष नारायण कुचे यांच्या नेतृत्वाखाली भाजपा पदाधिकारी यांच्यासह शहरातील तरुण-तरुणाई पदाधिकारी यांची उपस्थितीत अंबड शहरातून दि.१६ में रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौक ते शहरातील विविध भागातून आमदार नारायण कुचे यांच्या नेतृत्वामध्ये ऑपरेशन सिंदूर राबविणाऱ्या भारतीय सैन्य दलाला समर्थन देण्यासाठी..! अंबड तालुक्यातील राष्ट्रप्रेमी नागरिक व भारतीय जनता पार्टीच्या वतीने देशाच्या सीमांवर आपल्या सैनिकांनी दाखवलेला पराक्रम, त्याग व शौर्य यांचा सन्मान करण्यासाठी तिरगा रॅली काढण्यात आली यावेळी माजी सैनिकांचा सन्मान करण्यात आला.



यावेळी सर्व प्रथम छ. शिवाजी महाराजाच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून देश भक्तीवर तिरंगा रॅली काढण्यात आली, यामध्ये मोठ्या प्रमाणावर भारत माता कि जय, पाकिस्तान मुर्दाबाद या घोषणांनी शहरातील परिसर दुमदुमला होता, हि रॅली अंबड शहरतील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापासून तहसील कार्यालय परिसर, बस्थानक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा, महावीर चौक, महात्मा जोतीबा फुले चौक, महाराष्ट्र द्वार, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक, संत रोहिदास महाराज, जुनी गँस एजन्सी, संत कैकाडी महाराज चौक येथे समारोप करण्यात आला, यावेळी सेवानिवृत्त जवान श्री कैलास कोल्हे यांचा आमदार श्री नारायण कुचे यांनी शाल व पुष्पहार देऊन सन्मान केला, यावेळी उपस्थितांनी भारत माता कि जय, शहीद जवान अमर रहे, मुर्दाबाद मुर्दाबाद पाकिस्तान मुर्दाबाद अशा घोषणा दिल्या तर उपस्थित देशभक्त, भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध अँकँडमीतील तरुण-तरुणी यांनी उस्फुर्त सहभाग नोंदवला यावेळी आ.नारायण कुचे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी माजी सैनिक श्री कैलास कोल्हे, दीपक ठाकूर, अवधूत नाना खडके, देविदास कुचे, रमेश शहाणे, औदुंबर बागडे, प्रदीप पवार, सौरभ कुलकर्णी, केदार कुलकर्णी, डॉ.नंदकिशोर पिंगळे, डॉ.राहुल डोंगरे, जितेंद्र पालकर, गंगाधर वराडे, फेरोज शेख, बाळू खरात, संदीप खरात, विठ्ठलसिंह राणा, धर्मराज बाबर, मनोज साळवे, रमेश बुंदेलखंडे, सुरेश गुडे, बाळासाहेब तायडे, दीपक लोहकरे, नंदकिशोर पाटील, साईनाथ उकर्डे, धनंजय चावरे, श्रीराम नागरे सर, डॉ.राधकीसन जाधव, सौ.वैशालीताई कोटबे, पांडुरंग शिंदे, बाळू शहाणे, द्वारकादास जाधव, सुहास सोडणी, सुनील खांचंदनी, युसूफ मणियार, लक्ष्मण पदे, जगताप सर, मूळे सर, राखूडे सर, रामचंद्र भोजने, फैसल कुरेशी, सुनील बीडे, विलास राठोड, परमेश्वर लेंभे, प्रदीप भोजने, संपत जमधडे, कैलास वाघ, राम गाडेकर, यांसह देशप्रेमी नागरिक व भारतीय जनता पार्टीचे सर्व पदाधिकारी व तरुण तरुणाई, कार्यकर्त्ये मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होत.

# राजवर्धन पंडितचे एसएससी परीक्षेत उज्वल यश

गेवराई (प्रतिनिधी)

छत्रपती संभाजी नगर येथील नाथ व्हॅली स्कूलचा विद्यार्थी राजवर्धन रोहित पंडित यांनी मार्च २०२५ मध्ये झालेल्या एसएससी बोर्ड परीक्षेत ९५ टक्के गुण प्राप्त करून उज्वल यश संपादन केले आहे या यशाबद्दल त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. छत्रपती संभाजी नगर येथील नाथ व्हॅली स्कूलमध्ये शिक्षण घेणारा राजवर्धन पंडित हा विविध क्षेत्रांमध्ये अग्रेसर असून अनेक स्पर्धेमध्येही त्याने नावलौकिक मिळवलेला आहे. नुकत्याच झालेल्या एसएससी बोर्ड परीक्षेत ९५ टक्के गुण घेऊन यश संपादन केलेला राजवर्धन पंडित हा माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांचा नातू आणि युवा नेते रोहित पंडित व माजी नगरसेविका स्वरूपाताई



पंडित यांचा मुलगा आहे. या यशाबद्दल माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, गिरिकाभाभी पंडित, माजी जि प सभापती युधाजित पंडित, सौ अनुरूपाताई पंडित, युवानेते रोहित पंडित, सौ स्वरूपाताई पंडित, यशराज पंडित यांच्यासह प्राचार्य व सर्व शिक्षकांनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# फौजी च्या मुलीने ९७.२० टक्के गुण घेत जाफराबाद तालुक्यात ठरली अव्वल



जाफराबाद (प्रतिनिधी)

एस. बी. ओ. ए. पब्लिक स्कूल संभाजीनगर मधील विद्यार्थिनी कु. गौरी सुभाष भालके हिने ९७.२०/ टक्के गुण घेऊन जाफराबाद तालुक्यातुन प्रथम क्रमांक मिळवून यश संपादन केले आहे. या यशाबद्दल तिचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.सदरील विद्यार्थिनींचे वडील बीएसएफ मध्ये जवान असुन त्यांनी तिच्या निकालाचे कौतुक करुन परत युद्ध असल्यामुळे परत ड्युटीवर जॉईन होण्यासाठी रवाना झाले.

# सूक्ष्म,लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयातर्फे राष्ट्रीय पुरस्कार २०२४ साठी अर्ज करण्याचे आवाहन

नवी दिल्ली (प्रतिनिधी)

केंद्रीय सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाने सूक्ष्म, लघु आणि मध्यम (एमएसएमई) उद्योजकांच्या उत्कृष्ट कामगिरीची आणि त्यांच्या योगदानाची दखल घेऊन राष्ट्रीय स्तरावर पुरस्कार देऊन त्यांना प्रेरित आणि प्रोत्साहित करते. वर्ष २०२४ साठी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना विविध श्रेणींमध्ये ३५ राष्ट्रीय पुरस्कार दिले जातात. महिला उद्योजक, अनुसूचित जाती/जमातीतील उद्योजक तसेच ईशान्येकडील राज्यांमधील एमएसएमई उद्योजकांना विशेष तरतूदीद्वारे पुरस्कार दिले जातात. या योजनेअंतर्गत, पुरस्कारप्राप्त एमएसएमईंना ३ लाख रुपये (प्रथम पुरस्कार), २ लाख रुपये (द्वितीय पुरस्कार) आणि १ लाख रुपये (तृतीय पुरस्कार) बक्षीस स्वरूपात दिले जातात. त्याचबरोबर चषक आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले जाते.



**अंबड - माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे यांचे हस्ते दहावी बोर्ड परिक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांनी शरयू बाबासाहेब गोंटे हिचा गौरव करण्यात आला. याप्रसंगी बाळासाहेब गोंटे, उपसरपंच शिवाजीराव गोंटेसह आदी.**

# कै,सुंदररावजी (काका) शेळके पाटील मा.विद्यालय मोरवड चा शंभर टक्के निकाल

वडवणी (प्रतिनिधी)

वडवणी तालुक्यातील शिक्षण क्षेत्रात नावाजलेल्या मोरवड येथील राजे शिवछत्रपती शिक्षण प्रसारक मंडळ मोरवड संचलित, माध्यमिक विद्यालयाचा सलग दहाव्या वर्षी शंभर टक्के निकाल लागला. २००६ साली स्थापन झालेल्या या माध्यमिक विद्यालयाचे अनेक माजी विद्यार्थी वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे. महाराष्ट्र राज्य बोर्डाचा दहावी या वर्गाचा निकाल यावर्षी लागला असून सर्व विद्यार्थी पास असून सलग दहाव्या वर्षी १००% निकाल या शाळेने लावत एक वेगळा शैक्षणिक दर्जा टिकवून ठेवत आपले नाव केले आहे. प्रथम क्रमांक म्हणून चि. पवार दिनेश वैजनाथ ९२.४०% गुण घेऊन शाळेतून प्रथम आला. द्वितीय क्रमांक कु.गायकवाड अश्विनी गहिनीनाथ ८७.६०% टक्के गुण घेऊन व तृतीय क्रमांक कु.गिरे कोमल खंडू यांनी ८६.८०%टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झाले. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल शाळेचे संस्थापक अध्यक्ष आनंत (बप्पा) शेळके पाटील, मुख्याध्यापक सचिन वाघ सर, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, सर्व शिक्षणप्रेमी, सर्व गावातील नागरिक यांच्याकडून यशस्वी विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

वडवणी तालुक्यातील शिक्षण क्षेत्रात नावाजलेल्या मोरवड येथील राजे शिवछत्रपती शिक्षण प्रसारक मंडळ मोरवड संचलित, माध्यमिक विद्यालयाचा सलग दहाव्या वर्षी शंभर टक्के निकाल लागला. २००६ साली स्थापन झालेल्या या माध्यमिक विद्यालयाचे अनेक माजी विद्यार्थी वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे.

# पाटोद्याच्या सब रजिस्टार पाटील यांच्या भ्रष्ट कारभाराची चौकशी करुन त्वरित बदली करा- गोरख झेंड

पाटोदा ।प्रतिनिधी

पाटोदा येथील सहायक दुय्यम निबंधक सबरजिस्टर कार्यालयामध्ये पाटील नावाचे सबरजिस्टर हे अनेक वर्षांपासून ठाण मांडून बसले आहेत अनेक जमिनीच्या व प्लॉटच्या बोगस खरेदी विक्री रजिस्ट्री केल्या असुन आताही चालू असून ते या कार्यालयात अनेक वर्षांपासून ठाण मांडून बसले असुन या कार्यालयाच्या गेल्या पाच वर्षातील सर्व खरेदी विक्रीची व इतर सर्व कामकाजाची उच्च स्तरीय चौकशी समिती नेमुन चौकशी करून संबंधितांवर कारवाई करुन त्यांची त्वरित बदली करण्यात यावी अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हा उपाध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते गोरख झेड यांनी केली आहे.

याबाबत अधिक माहिती पाटोदा येथील सहायक दुय्यम निबंधक कार्यालयात असणारे सबरजिस्टर पाटील हे अनेक वर्षांपासून पाटोदा येथील कार्यालयात ठाण मांडुन बसले असून या ठिकाणी दररोज अनेक प्रकारच्या गुंठेवारी नसणाऱ्या सह एकच एन ए अनेक खरेदी विक्री रजिस्ट्रीसाठी वापरले जात असुन बोगस रजिस्ट्री खरेदी विक्री होत असून यामध्ये मोठ्या प्रमाणात मिलीभगत होत आहे त्यामुळे निषपाप शेतकऱ्यांना मात्र त्रास सहन करावा लागत असुन या सर्व प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी समिती नेमुन चौकशी करून सबरजिस्टर यांच्यावर तात्काळ कारवाई करण्यात यावी अशी मागणी बहुजन वंचित आघाडीचे उपाध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते गोरख झेंड यांनी जिल्हाधिकारी यांच्याकड

# माजी आरोग्य मंत्री राजेश टोपे यांचे हस्ते दहावी बोर्ड परिक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांनी शरयू बाबासाहेब गोंटे हिचा गौरव

अंबड (प्रतिनिधी)

दि.१६ रोजी माजी आरोग्य मंत्री तथा मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राजेश टोपे व संस्थेच्या सचिव मनीषाताई टोपे यांच्या हस्ते शुक्रवारी (ता.१६ ) अंबड मत्स्योदरी विद्यालयातील विद्यार्थीनी शरयू बाबासाहेब गोंटे हिने दहावी बोर्ड परिक्षेत गुणवंत ठरल्याने हिचा पुष्पगुच्छ देऊन पेढा भरून कौतुक करत अभिनंदन करत भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.याप्रसंगी बाळासाहेब गोंटे, उपसरपंच शिवाजीराव गोंटेसह आदींची उपस्थिती होती. शरयू गोंटे हिचे

भगवानराव गवारे, भगवानराव थोरात, रावसाहेब गोल्डे, प्रल्हाद उगले, दिलीप गव्हाणे,नवनाथ गवारे,शिवाजी तांगडे, राजेश बुरकुल, अविनाश लोखंडे,विष्णु गवारे , प्रल्हाद भडांगे, अरूण भडांगे,बाळू भडांगे, सह आदींनी अभिनंदन करत भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

दैनिक समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
SAMARTH RAJYOG
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA )


# पहिल्या सेपक टकारा क्रीडा स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा संघ रवाना

परभणी (प्रतिनिधी)

भारत सरकार खेलमंत्रालय व खेलो इंडिया वतीने पहिल्या खेलो इंडिया बीच सेपक टकारा क्रीडा स्पर्धा (दिव ) येथे दि. १९ ते २४ मे दरम्यान संपन्न होणार असुन या स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्य बिच सेपक टकारा संघ अलिबाग बिच येऊन दिव दमनसाठी रवाना झाला. या संघास शुभेच्छा देण्यासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ, क्रीडा अधिकारी आकाश डोंगरे, महाराष्ट्र राज्य प्रशिक्षक गणेश माळवे, निवड समिती सदस्य वैभव शिंदे उपस्थित होते. महाराष्ट्र राज्य सेपक टकारा संघात लेखांशु लडके,

सौरभ कोसुळकर , ओम मुळे (वर्धा), इर्शाद सागर , समीर थूल , मोहम्मद अली, मोहम्मद सोहेल (नागपूर), अमोल राठोड, सुकुमार तिवारी (नाशिक), सुदेश कांबळे (नांदेड), फैझान शेख (जळगाव), ऋषिकेश यादव (ठाणे), प्रशिक्षक: गणेश माळवे (परभणी) सह प्रशिक्षक दर्शन हस्ती (वर्धा), संघ व्यवस्थापक विकास माने, क्रीडा अधिकारी (पुणे) यांचा समावेश आहे. खेळाडुंना क्रीडा आयुक्त हिरालाल सोनवणे, सहसंचालक क्रीडा सुधीर मोरे, जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ, क्रीडा उपसंचालक उदय जोशी, नवनाथ फडतरे, सुहास पाटील, क्रीडा अधिकारी अरुण पाटील ,सेपक टकारा संघटनेचे राज्य अध्यक्ष विपीन कामदार, राज्य सरचिटणीस डॉ.योगेंद्र पांडे, राज्य उपाध्यक्ष प्रविण कुपटीकर, डॉ .अमृता पांडे, डॉ .विनय मुन,शेख चाँद, रवि बकवाड, परवेज खान यांनी अभिनंदन करुन पुढील स्पर्धेस शुभेच्छा दिल्या.



# जिंतूरात लग्नसराईत धक्का; दागिन्यांचे पैसे घेऊन ज्वेलर्स पसार

जिंतुर । प्रतिनिधी

शहरात एका ज्वेलर्स दुकानदाराने अनेक ग्राहकांकडून दागिने देतो, अशी बतावणी करून मोठ्या प्रमाणात पैसे उकळून पसार झाल्याची घटना घडली आहे. ही बाब समजताच आर्थिक फसवणुकीची भीती वाटल्याने संतप्त ग्राहकांनी दुकानासमोर मोठ्या प्रमाणात गर्दी केली. त्यामुळे काही काळ परिसरातील वाहतूक ठप्प झाली होती. ही घटना दि. १५ मे रोजी रात्री सुमारे ९:४५ च्या सुमारास घडली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत मध्यस्थी केली.

जिंतूर शहरात घडलेली ज्वेलर्स फसवणूक प्रकरण ही केवळ आर्थिक लूट नाही, तर सामान्य नागरिकांच्या भावनांवर आणि विश्वासावर झालेली घातक कुर्हाड आहे. लग्नसराईच्या तोंडावर असंख्य कुटुंबांनी आपल्या जिवाचे पैसे सुरक्षित समजून एका स्थानिक सराफाकडे ठेवले. मात्र, हाताशी कोणतीही कायदेशीर हमी नसतानाही फक्त पारंपरिक विश्वासावर आधारित व्यवहारांनी आज त्यांच्या जीवनात मोठे आर्थिक आणि मानसिक संकट आणले आहे. संबंधित दुकानदाराचा पसार होणे आणि त्याच्या कुटुंबीयांचे संपर्कात नसणे हे या फसवणुकीला अधिक गंभीर बनवते. नागरिकांच्या रोषाचा भडका उडणे स्वाभाविकच आहे, कारण कोट्यवधी रुपयांचा गोरगरिबांचा पैसा लुबाडल्याची भावना संपूर्ण शहरभर पसरली आहे. पोलिसांनी घटनास्थळी त्वरीत धाव घेऊन परिस्थिती नियंत्रणात आणली असली तरी यापुढील काळात प्रशासनाकडून या प्रकरणात जलद आणि कठोर कारवाई होणे अत्यावश्यक आहे. यासोबतच, अशा प्रकारचे व्यवहार करताना नागरिकांनी कायदेशीर दस्तऐवज आणि पावत्यांची काळजी घेणे ही देखील काळाची गरज आहे. ही घटना इतर शहरांतील नागरिकांसाठी देखील एक गंभीर इशारा आहे. विश्वासावर व्यवहार करताना फसवणुकीच्या शक्यता लक्षात घेऊन सावधगिरी बाळगणे हीच सुरक्षितता.



# परभणीतील अखुंद शाह बाबा यांच्या उर्सास सुरुवात

## गुप्ता परिवाराच्या वतीने मानाचा संदल : दर्गाह परिसरात विविध कार्यक्रमांचे आयोजन

परभणी (प्रतिनिधी)

येथील शासकीय इमारती समोरील हजरत सय्यद अखूंद शहा बाबा रहे सरवरे अजीज यांच्या उर्सास आज शुक्रवार १६ मे पासून सुरुवात झाली असून दर्गाह परिसरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मानवतेचा व प्रेमाचा संदेश देणारे अखुंद शहा बाबा यांच्या दर्ग्यावर नेहमीच भाविक भक्तांची ओढ असते. आजपासून सुरू झालेल्या उर्सानिमित्त शहरातील शिवाजी नगर येथे राहत असलेल्या रेणुका विक्रम गुप्ता यांनी मानाचा संदल काढून दर्ग्यावर चादर चढविण्यात आली. या कार्यक्रमास स्वराज सिंह परिहार, बालकिषण चांडक, प्रदीप पांडे, अरुण मराठे, विक्रम गुप्ता, सुनील बांगड, कृष्णा नगरसाळे, नदीम मुजावर, शेख जावेद, मिलिंद वाघमारे, शेख सुलेमान, रईसोद्दिन सिद्दीकी, सय्यद इब्राहिम, अमृता गुप्ता, रोहिणी पांडे, शीतल बांगड, आदींसह भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी आलेल्या भाविक भक्तांसाठी अन्नदानाचे आयोजनही केले होते. आपणही समाजाचे काही देणे लागते ही उदात्त भावना डोळ्यासमोर ठेवून मागील ४० वर्षापूर्वी सुरेशदादा परदेशी यांनी येथील अखुंद शाह बाबा यांच्या दर्ग्यात उर्स निमित्त संदल काढून अन्नदानास सुरुवात केली होती. हीच परंपरा कायम राखत परदेशी यांची कन्या रेणुका परदेशी गुप्ता यांनी अविरत सुरू ठेवली आहे.



# वाघाळा येथे डेंग्यू दिवस साजरा

पाथरी (प्रतिनिधी)

तालुक्यातील वाघाळा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत राष्ट्रीय डेंग्यू दिवस साजरा करण्यात आला. वाघाळा अंतर्गत सर्व कार्यक्षेत्रात ग्रामपंचायती च्या सहकार्याने आरोग्य सेवक, आरोग्य सेविका व आशाताई यांच्या मार्फत डासांपासून होणार्या डेंग्यू आजाराबाबत जनजागृती करण्यात आली. डासांमुळे डेंग्यू, हिवताप, चिकुनगुनिया हे आजार पसरतात या आजाराला प्रतिबंध करण्यासाठी आठवड्यात एक दिवस कोरडा पाळणे, पाण्याची डबकी बुजवणे, नाल्या वाहते करणे,परिसर स्वच्छ ठेवणे, वापराचे पाणी नियमित झाकून ठेवावे असे नागरिकांना आवाहन करुन जनजागृती करण्यात आली.. तसेच आरोग्य कर्मचारी व आशाताई यांनी घरोघरी भेटी देऊन डासअळी सर्व्हेक्षण केले डासअळी आढळलेल्या दुषित कंटेनर मध्ये अबेट टाकण्यात आले. आरोग्य विभाग डेंग्यू आजाराला प्रतिबंध करण्यासाठी अनेक उपक्रम ग्रामपातळीवर राबवितच असतात पण नागरिकांनीही याबाबत जागरुकता दाखवून डासअळी प्रतिबंध कार्यवाहीस सहकार्य करावे असे एस सी बोत आरोग्य निरीक्षक वाघाळा यांनी नागरीकांन सोबत संवाद साधला.. वाघाळा अंतर्गत डेंग्यू आजाराबाबत जनजागृती मोहीम डॉ निखिल पुजारी तालुका आरोग्य अधिकारी व डॉ सिद्दिकी वैद्यकीय अधिकारी वाघाळा यांचे मार्गदर्शन आणि डॉ बाळासाहेब सुरवसे विस्तार अधिकारी व संजय कदम ता पर्यवेक्षक यांच्या सुचनेनुसार अनिल पवार, हनुमान बागलाने, विहिटकर,चांगुना ठोंबरे, मयुरी यादव, डॉ बरसाले, ढगे, वर्षा गायकवाड, सर्व आशाताई, मिना चांदीवाले मैडम, मगर आरोग्य निरीक्षक व बोत आरोग्य निरीक्षक यांनी यशस्वीपणे




# टँकर – छोटा हत्ती वाहन धडकेत वाहन चालक जखमी

ताडकळस पोलिसांत गुन्हा नोंद

ताडकळस (प्रतिनिधी)

टँकर चालकाने निष्काळजीपणाने वाहन चालविल्यामुळे छोटा हत्ती या वाहनाच्या धडकेत चालकासहीत अजून एकाला गंभीर दुखापत झाली आहे. तसेच छोटा हत्ती वाहनाचे नुकसान झाल्याप्रकरणी ताडकळस पोलिसांत गुरूवार (दि. ८) रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, सय्यद हुजूर रा. धार रोड परभणी हे गुरुवारी परभणी ते पिंपळगाव जात असताना वसमत रस्त्यावर असोला पाटी परिसरात पुढून येणाऱ्या टँकर वाहन क्रमांक एनएल ०१ एल ८११२ या वाहनाने

पुढून येणाऱ्या छोटा हत्ती या वाहन क्रमांक एमएच २६ बीई ०३३१ वाहनाला गुरुवारी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास आसोला पाटी परिसरात टँकर निष्काळजीपणे चालवून जोराची धडक दिली. या धडकेत फिर्यादी सय्यद हुजूर व त्याच्यासोबत असलेल्या शेख सुजाउद्दीन शेख खाजा याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली आहे. तसेच छोटा हत्ती या वाहनाचे अंदाजे ३० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. याप्रकरणी छोटा हत्ती चालक सय्यद हुजूर यांनी ताडकळस पोलिसांत अज्ञात चालकाविरुद्ध तक्रार दिली आहे. यावरून ताडकळस पोलिसांत गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

# बांधकामासाठी अनेकांना लावला ५० लाखांचा चुना

मानवत । प्रतिनिधी

तालुक्यातील ग्रामीण भागात अनेकांना बांधकाम करून देतो म्हणून त्यांच्याकडून जवळपास ५० लाखांची उचल घेऊन बांधकाम अर्धवट सोडून पोबारा करणारा कंत्राटदार पोलिसांच्या ताब्यात सापडला असून त्याने ग्रामीण भागातील अनेक जणांकडून जवळपास ५० लाख रुपयांची उचल घेतल्याची माहिती मिळत आहे. याप्रकरणी मानवत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की मानवत तालुक्यातील मंगरूळ येथील विठ्ठल अंकुशराव निलवर्ण यांनी आपल्या घराचे बांधकाम काढले होते. त्यांच्या ओळखीचे नरळद येथील व्यंकट श्रीधरराव कुलकर्णी यांना बांधकाम बाबत चौकशी केली. त्यांनी त्यांचे बांधकाम करत असलेले गुत्तेदार अमजद खान इब्राहिम खान (रा. धार रोड परभणी) यांना विठ्ठल नीलवर्ण यांच्या राहत्या घरी घेऊन आले. त्यावेळी त्यांना बांधकामाची चौकशी करून त्यांना १३०० रुपये प्रति चौ. फुटाप्रमाणे बांधकाम देण्यात आले. दि २९ नोव्हेंबर २०२४ रोजी मानवत येथील नोटरी धारक वकिलाकडून बांधकामाचा करारनामा करून घेण्यात आला. यावेळी गुत्तेदार यांना बांधकामासाठी ३ लाख रुपये दिले होते. त्याचप्रमाणे बांधकाम सुरुवात झाल्यानंतर घराच्या पायाभरणी झाली. पायाभरणीनंतर त्यांना २ लाख रुपये देण्यात आले. पैसे घेऊन गेल्यानंतर त्यांनी गुत्तेदारास वारंवार मजूर पाठवून काम पूर्ण करण्याबाबत तगादा लावला. मजूर पाठवतो असे म्हणून वेळ काढून नेल्या जात होती. यावेळी त्यांचा भाऊ ऋषिकेश एकनाथ निलवर्ण याने सुद्धा त्यांच्या घराचे बांधकाम गुत्तेदार अमजद खान इब्राहिम खान यास दिले होते. त्यानी एकूण ७ लाख रुपये बांधकाम करिता दिले होते. त्यांचे सुद्धा बांधकाम अर्धवट सोडून सदर गुत्तेदार पळून गेला. या गुत्तेदाराबद्दल त्यांनी माहिती काढल्यावर असं समजले की तालुक्यातील आटोळा, सोमठाणा व नरळद येथील साधारणतः सात ते आठ जणांचे पैसे घेऊन त्याने बांधकाम न करता पळून गेल्याचे दिसून आले. त्यामध्ये विठ्ठल सखाराम करडले रा. आटोळा १ लाख ६५ हजार रुपये, सिताराम विठोबा करडले रा. आटोळा ७ लाख रुपये , दत्ता सखाराम करडले रा.आटोळा ४ लाख ५० हजार रुपये , पार्वतीबाई उद्धवराव बारहाते रा. नरळद ४ लाख ५० हजार रुपये , पांडुरंग यादवराव निर्वळ रा.नरळद ७ लाख २५ हजार रुपये , व्यंकटराव श्रीधरराव कुलकर्णी रा. नरळद ५ लाख २५ हजार रुपये , संतोष माणिकराव मुळे रा. सोमठाणा २ लाख ५० हजार रुपये , रामकिशन मुंजाजी निर्वळ रा. सोमठाणा ७ लाख रुपये व श्रीकिशन आबासाहेब निर्वळ रा. सोमठाणा २ लाख ९० हजार रुपये या लोकांचे एकूण ४२ लाख ५५ हजार रुपये एवढी रक्कम घेऊन बांधकाम अर्धवट ठेवून पळून जाऊन वरील लोकांची फसवणूक केल्या प्रकरणी विठ्ठल नीलवर्ण यांचे फिर्यादीवरून मानवत पोलिसात भारतीय न्याय संहिता चे कलम ३१८(४) व ३१८(२) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला असून या गुन्ह्याचा तपास मानवत पोलीस स्टेशन चे पोलीस उपनिरीक्षक दिगंबर पाटील हे करत आहेत. आरोपी अटक असून त्यास न्यालयात प्रस्तुत करण्यात आले.त्यास ३ दिवसाची पोलिस कोठडी मिळाली आहे.

**नागरिकांनी बांधकाम देताना सतर्कता बाळगावी : पो.नि.संदीप बोरकर**

या घटनेच्या अनुषंगाने मानवत पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक संदीप बोरकर यांना विचारणा केली असता त्यांनी सांगितले की तालुक्यातील नागरिकांनी बांधकाम देताना बांधकाम गुत्तेदार व मजूर यांची ओळख पटवूनच बांधकाम द्यावे. एवढेच नव्हे तर शासनाने सध्या प्रत्येक कामगाराला शासनाकडून ओळखपत्र दिले आहे. शासकीय ओळखपत्र दाखवल्याशिवाय बांधकाम देऊ नये.बांधकाम करते वेळेस कामगार व गुत्तेदार हे सरळ घरात वावरतात अशा वेळी कोणताही गैरप्रकार होऊ नये यासाठी सतर्कता बाळगावी व अशा प्रकारच्या घटना होणार नाहीत याची दक्षता घ्यावी असे त्यांनी सांगितले .


# पाणी नमुन्याची तपासणी फिल्ड टेस्ट किट द्वारे करा - सीईओ नतिशा माथुर

परभणी (प्रतिनिधी)

जिल्ह्यात दूषित पाण्यामुळे उद्भवणाऱ्या आजारावर आळा बसण्यासाठी तसेच ग्रामस्थांना शुद्ध पाणी मिळण्यासाठी नियमितपणे एफ.टी.के किट द्वारे तपासणी करणे गरजेचे आहे. या किटच्या माध्यमातून जनजागृतीसाठी राज्य राज्य शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या वतीने दि. १२ मे ते दि. ७ जून या कालावधीत जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानात ग्राम पातळीवर (एफ.टी. के) फिल्ड टेस्ट कीटच्या मदतीने नियमितपणे पाणी तपासणी करण्याचे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक नतिशा माथुर यांनी केले आहे.

या अभियानाचा जिल्हास्तरीय शुभारंभ शुक्रवार दि. १६ मे रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथुर यांच्या हस्ते जिल्हा परिषदेच्या सभागृहात करण्यात आला. यावेळी कार्यक्रम प्रसंगी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) ओमप्रकाश यादव, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) डॉ.संदीप घोन्सीकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पा.व स्व.) शिवराज केंद्रे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.) रेखा काळम, प्राथमिक शिक्षणाधिकारी सुनील पोलास, जिल्हा कृषी अधिकारी दीपक सामाले, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ.रावजी सोनवणे, उप अभियानात किशोर लिपणे, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा जिल्हा प्रयोगशाळेचे सुनील यस्के, दुष्यंत करजगावकर, निवास खूपसे यांच्यासह सर्व तालुक्यांचे गट विकास अधिकारी, विस्तार अधिकारी, सरपंच, ग्राम पंचायत अधिकारी यांची उपस्थिती होती.

यावेळी उपस्थितांना (एफ.टी. के.) फिल्ड टेस्ट किट द्वारे पाण्याची तपासणी कशा प्रकारे केली जाते याचे प्रात्यक्षिक करून दाखविण्यात आले. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथुर यांनी पाणी तपासणी करण्याची प्रक्रिया समजून घेतली.




# बालरंगभूमी परिषदेच्या तिरंगा रॅलीने वेधले लक्ष




परभणी (प्रतिनिधी)

बालरंगभूमी परिषद शाखा परभणीच्या वतीने भारतीय सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी व शहिद झालेल्या सैनिकांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. आम्ही भारतीय सैनिकांच्या सोबत आहोत हा विश्वास बालरंगभूमी परिषदेच्या बालकलावंतांनी रॅली च्या माध्यमातून व्यक्त केला. या रॅलीने परभणी करांचे लक्ष वेधले.

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरातून शुक्रवारी सकाळी या तिरंगा रॅलीला सुरुवात झाली यावेळी बालरंगभूमी परिषदेचे जिल्हाध्यक्ष आबा ढोले, उपाध्यक्ष प्रा. नितीन लोहट, कार्याध्यक्ष उपेंद्र दुधगावकर, प्रमुख कार्यवाह तथा मध्यवर्ती शाखेचे कार्यकारी सदस्य त्र्यंबक वडसकर, समन्वयक प्रमोद बल्लाळ, कोष्याध्यक्ष संजय पांडे, मनीषा उमरीकर, सविता देशपांडे , प्रकाश बारबिंड, शिवाजी आरळकर, दिनकर देशपांडे, अनिकेत शेंडे , शंकर आजेगावकर, विठ्ठल कटारे, ओमप्रकाश सूर्यवंशी, शरद देशमुख, सौ. डहाळे, कल्हेवाड सर आदींची उपस्थिती होती.' भारत माता की जय ' ' भारतीय सैनिकांचा विजय असो ' ' वंदे मातरम ' अशा घोषणा देत ही बालकलावंतांची रॅली राजगोपालचारी उद्यानात पोहोचली. या ठिकाणी शहीद स्तंभाला पुष्पहार अर्पण करून रॅलीचा समारोप करण्यात आला. याप्रसंगी उपेंद्र दूधगावकर, प्रा. नितीन लोट यांनी मनोगत व्यक्त केले. बालरंगभूमीच्या या तिरंगा रॅली ने बालकांमध्ये देशाप्रती प्रेमभावना व सैनिकाप्रति कृतज्ञतेचा भाव व्यक्त झाला. या रॅलीत जिजाऊ ज्ञानतीर्थ चे विद्यार्थी व शिक्षक सहभागी झाले होते.

# लोक अदालतीतून २ हजार ५२७ प्रकरणे निकाली ; ९ कोटी ३२ लाख ४१ हजार ७६२ रुपये वसूली

परभणी (प्रतिनिधी)

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण परभणीच्या वतीने १० मे रोजी परभणी व हिंगोली जिल्ह्यात आयोजित केलेल्या राष्ट्रीय लोक अदालतीतून २ हजार ५२७ प्रकरणे निकाली काढण्यात आली व ९ कोटी ३२ लाख ४१ हजार ७६२ रुपयांची वसूली करण्यात आली.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणने आयोजित केलेल्या या लोक अदालतीमध्ये सर्व प्रकारची तडजोडपात्र फौजदारी प्रकरणे, भारतीय चलनक्षम दस्तऐवज अधिनियम १८८१, बँक वसूली प्रकरणे, मोटार अपघाताची प्रकरणे, कौटूंबिक वादाची प्रकरणे, कामगारांची प्रकरणे, भूसंपादन प्रकरणे, वीज प्रकरणे व पाणी आकार प्रकरणे, वेतन व भत्त्याची सेवा विषयक प्रकरणे, महसूल प्रकरणे, दिवाणी स्वरुपाची इतर प्रकरणे, बँकेची वसूली, वादपूर्वी दाखल प्रकरणे समोर ठेवण्यात आली. न्यायालयातील एकूण ४४९ प्रलंबित प्रकरणातून ६ कोटी ८५ लाख ८१ हजार २०६ रुपये रक्कम वसूल करण्यात आली. तर स्पेशल ड्राईव्ह मधून ४५३ प्रकरणे व वाद दाखल पूर्व १ हजार ६२५ प्रकरणातून २ कोटी ४६ लाख ६ हजार ५५६ रुपये वसूल करण्यात आले.

या अदालतीच्या यशस्वीतेकरीता प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तसेच जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष डॉ. एम.एस. सोळंके व वकील संघाच्या सदस्यांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली. या लोक न्यायासाठी एका दिवाणी प्रकरणात ऑस्ट्रेलिया येथून एक पक्षकार आले होते, त्या प्रकरणात यशस्वी तडजोड झाली, अशी माहिती जिल्हा विधी व सेवा प्राधिकरणाच्या सचिव श्रीमती अर्चना तामणे यांनी दिली.

# शासकीय निवासी शाळा शिरूर (का.) येथे शंभर टक्के निकालाची परंपरा कायम



मानूर ।प्रतिनिधी

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त अनुसूचित जाती मुलांची शासकीय निवासी शाळा शिरूर चा शालंत परीक्षा निकाल प्रतिवर्षी प्रमाणे या ही वर्षी शंभर लागला निकालाची परंपरा कायम ठेवलेली आहे ३५ पैकी २७ विद्यार्थी विशेष प्रविण्यामध्ये पास झाले.इयत्ता दहावीच्या शाळेतून दिपक राजाभाऊ खाटीकमारे ९०.४०% गुण प्राप्त करून प्रथम आला. द्वितीय रोहित चंद्रकांत चौरे ८८.६०% तर तृतीय राहुल सर्जेराव डोंगरे ८८% गुण मिळवले आहेत.शासकीय निवासी शाळा शिरूर येथे अभ्यासाबरोबरच विविध अभ्यासपूरक उपक्रम राबवून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व गुणवत्ता विकास करण्यासाठी मुख्याध्यापिका अस्मिता जावळे व येथील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी कार्यरत राहतात.या यशाबद्दल दिपक खरात प्रादेशिक उपायुक्त छत्रपती संभाजीनगर , प्रदीप भोगले सहाय्यक आयुक्त बीड यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या.तसेच मुख्याधापिका अस्मिता जावळे, शिक्षक भारत शिंदे, पाचे एस.एम, जावळे पी.डी, सानप पी.डी, फंड एस.के,शिरसाट ए. एस, गायके यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# जाफ्राबाद येथे स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज जयंती साजरी




जाफराबाद (प्रतिनिधी)

जाफराबाद येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे स्वराज्य रक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर अँड.शरद वाकडे यांनी प्रकाश टाकून सर्वांना छत्रपती संभाजी महाराज जयंतीच्या शुभेच्छा दिल्या यावेळी माजी सभापती राजेश चव्हाण,मुख्याध्यापक उमेश दुनगहू, माधव चव्हाण,संजय लोळगे,प्रभू गाढे,पत्रकार संघाचे अध्यक्ष मुकेश भारद्वाज,शिवजयंती उत्सव समितीचे अध्यक्ष कृष्णा शिरसाठ,गणेश गायकवाड, राजु बऱ्हाटे,विशाल वाकडे,राहुल वाकडे,कृष्णा पिठोरे, धनंजय ढवळे, दिलीप बोबडे, कृष्णा जाधव, गजानन दीक्षित,मंगेश गायके तसेच सर्व शिवशंभू प्रेमी नागरिक उपस्थिती होते.

# दहावी परिक्षेत आदीराज शेळके याचे दैदिप्यमान यश

डॉ आशिष तिवारी/जालना

येथील आदीराज दीपक शेळके यांनी इयत्ता दहावीच्या परिक्षेत ९४.४० टक्के गुण प्राप्त करून दैदिप्यमान यश संपादन केले आहे.आदीराज शेळके हा बुलढाणा जिल्ह्यातील चिखली येथील चैतन्य गुरुकुल व ज्युनियर कॉलेजचा विद्यार्थी आहे. इयत्ता सातवी पर्यंतचे त्याचे शिक्षण हे जालना येथील श्री. म. स्था. जैन विद्यालयात झाले आहे. आदीराज त्याच्या यशाचे श्रेय हे त्याचे आत्येमामा रविंद्र वायाळ, आत्या रेणुका वायाळ (शेळके), आजी विमलबाई शेळके व त्याच्या चैतन्य गुरुकुल येथील शिक्षकांना देतो. दैनिक युवा आदर्शचे संपादक दीपक शेळके यांचा तो मुलगा आहे.



आदीराज यास गणितात ९८, इंग्रजीत ९६, विज्ञान ९४, हिंदी ८८, मराठी ९४ सोशल सायन्स या विषयात ९० गुण मिळाले असून एकूण ५०० पैकी ४७२ गुण मिळवून त्यांने ९४.४० टक्केवारी मिळविली आहे. चैतन्य गुरुकुल व ज्युनियर कॉलेजमध्ये म्हणजेच शाळेतून तो पाचवा आला आहे.

त्याच्या या यशाबद्दल त्याचे चैतन्य गुरुकुलचे संस्थाचालक आशुतोष चौधरी, राजेश ठेंग, मधुकर अंभोरे, शिवकुमार नागपुरे, हर्षवर्धन सावळे, लक्ष्मण परिहार, सौ. शारदा जोशी, जय मुळावकर आदी शिक्षकगण तसेच दीपक शेळके, रविंद्र वायाळ, रेणुका वायाळ, वर्षा शेळके, भारत बोराडे, उदयराज शेळके, रेखा जाधव, दिलीप कळणे, चंदा केंधळे, साक्षी भुतेकर, भगवान जाधव, निलावती बोराडे, उद्धव केंधळे, सुधाकर खरात, केदार गोरे, आनंद जाधव, शितल केंधळे, दिंगबर मानवतकर, प्रविण गोरे, शितल मानवतकर, सोनाली गोरे, मीना काळे-आगळे, कमलताई तुल्ले, माऊली कळणे, अंकीता बोराडे, संदीप भाकरे यांच्यासह मित्र परिवारातून त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# जि.प.मुलींचे हायस्कूलचा ९९.४६ टक्के निकाल;सेमी माध्यमचा १०० टक्के

## प्रणिताने मिळविले ९८.२० टक्के,९७ टक्केच्या ४ तर ९५ टक्केच्यावर ८ मुली

मुखेड / प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या इयत्ता दहावी परिक्षेचा निकाल नुकताच ऑनलाईन पद्धतीने परिक्षा मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहीर झाला असुन या निकालात मुखेड शहरातील नामांकित असलेली आदर्श शाळा,पिएमश्री जिल्हा परिषद मुलींचे हायस्कूलचा निकाल ९९.४६ टक्के लागला असुन विद्यार्थ्यांनी प्रशालेची उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखत १८८ पैकी १८७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.सेमी माध्यमचा १०० टक्के निकाल लागला आहे.कु.प्रणीता पोतदार या विद्यार्थीनिंने ९८.२० टक्के गुण मिळवून स्वतासह शाळेच्या नावाचा डंका जिल्ह्यात गाजवला आहे.या नेत्रदीपक यशाबद्दल गुणवंत विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे सर्वस्तरातुन अभिनंदन होत आहे.

फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या दहावीच्या शालांत प्रमाणपत्र परिक्षेचा निकाल नुकतच दि.१३ में रोजी ऑनलाईन पद्धतीने जाहीर करण्यात आला.सदर निकालात जि.प.मुलींचे




हायस्कूल मुखेड प्रशालेच्या मुलींनी उल्लेखनीय यश संपादन करीत बाजी मारली असुन कु.प्रणीता विजय पोतदार या मुलींने ९८.२० टक्के गुण मिळवुन इतिहास रचला आहे तसेच प्रथमश्रेणी मध्ये १२ विद्यार्थी तर व्दितीय श्रेणीमध्ये ०८ विद्यार्थी तसेच तृतीय श्रेणीत ०९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहे त्याचबरोबर ९० टक्के पेक्षा अधिक शेकडा गुण घेवुन ५१ विद्यार्थी उर्तीण झाले आहेत तर विशेष प्राविण्यासह १५८ विद्यार्थी उर्तीण झाले असुन ०१ विद्यार्थी परिक्षेला अनुपस्थित राहिल्यामुळे अनुत्तीर्ण राहिले आहे.या निकालात प्रणिता पोतदार या विद्यार्थीनीने ९८.२० टक्के घेवुन प्रशालेतुन प्रथम येण्याचा मान पटकावला आहे.रिया ताटीपामल ९७.८० टक्के,भक्ती पांचाळ ९७.८० टक्के,प्राची मुसळे ९७.८० गुण घेवुन या तिन्ही विध्यार्थीनींनी व्दितीय क्रमांक मिळवीला आहे. त्याचबरोबर मधुरा वट्टमवार हीने ९७ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक,दिपाली गोरे ९६.०६ टक्के,गौरी जाधव ९६.०६ टक्के, समृद्धी साबणे ९६.०४ टक्के, शितल कांबळे ९५.०६ टक्के, शृष्टी नखाते ९५.०४ टक्के, शिवानी मामीलवाड ९५.०४ टक्के,साधना होनवडज ९५.०२ टक्के,ऋतुजा जाधव ९४.०८ टक्के मिळवून नेत्रदीपक यश मिळविले आहे.जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांचा निकाल पाहिला तर विद्यार्थी संख्येचा जर विचार केल्यास पिएमश्री जि.प.मुलींचे हायस्कूल हे दहाविच्या निकालात जिल्ह्यात १ नंबरला असल्याचे चर्चा होत आहे.या यशाबद्दल गटविकास अधिकारी सि.एल.रामोड, गटशिक्षण अधिकारी कैलास होनधरणे,शिक्षण विस्तार अधिकारी तथा केंद्रप्रमुख यु.पी.चव्हाण,मुख्याध्यापक डी.जे.कांबळे,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष महेताब शेख, उपाध्यक्षा सौ.उर्मिला गिते, सांस्कृतिक विभागप्रमुख दिलीपराव देवकांबळे,शिक्षक नेते दिपक लोहबंदे, व्ही.एस. जाधव,डॉ.बरकतउल्ला,मधुमती लोणीकर,बळीराम मुद्देवाड, अनकडे,हरी पवार,नागनाथ स्वामी,व्यंकटी केंद्रे,भवानिसिंह चौहाण यांच्यासह शालेय व्यवस्थापन समितीचे सर्व पदाधिकारी,प्राथमिक व माध्यमिकचे सर्व शिक्षक, शिक्षिका,शिक्षकेत्तर कर्मचारी व विविध क्षेत्रातील मान्यवरांनी गुणवंत विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे कौतुक करीत अभिनंदन केले आहे.

# 'लाडकी बहीण' डोईजड

लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात भाजपला अपेक्षित यश प्राप्त न झाल्याने विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील तीनचाकी सरकारने विविध घोषणांचा सुकाळ करत आधीच रिती झालेली तिजोरी पूर्णपणे साफ करून टाकली. तीन डोकी आणि विचारांच्या या सरकारने जाहीर केलेल्या घोषणा पाहता, हे सरकार सत्तेवर आल्यास या योजना खरंच पूर्णत्वास जातील का? असा प्रश्न विचारवंतांनाच काय, पण सर्वसामान्य नागरिकांनादेखील पडला होता. सध्याची परिस्थिती पाहता मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना ही सरकारसाठी डोईजड ठरत आहे. राज्यातील लाडक्या बहिणींना दर महिन्याला पैसे मिळणे अपेक्षित असताना, हे पैसे दोन ते तीन महिन्यांनी एखाद्या सण, उत्सवाचे औचित्य




साधून दिले जात आहेत. यासाठी कोणत्याना कोणत्या विभागातील निधी वळवला (की पळवला) जात आहे. त्यामुळे सरकारमध्ये सहभागी मंत्री जाहीरपणे नाराजी व्यक्त करताना दिसत आहेत. अर्थमंत्री अजित पवार यांनी अर्थसंकल्पात या योजनेसाठी तरतूद करून ठेवली असल्याची माहिती दिली होती. महायुती सरकारने विधानसभेत ३५ हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मंजूर केल्या. यामध्ये १४०० कोटी रुपयांची तरतूद मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी करण्यात आली होती. असे असतानादेखील कोणत्या तरी खात्याचा निधी वळवून या लाडक्या बहिणींना खुश ठेवण्याचे काम सरकारकडून सुरू आहे. सत्तेवर आल्यास लाडक्या बहिणींना दर महिन्याला दिला जाणारा १५०० रुपये निधी वाढवून तो २१०० रुपये केला जाईल, अशी घोषणादेखील महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीदरम्यान केली होती. पण या निधीत वाढ सोडा, आहे ते १५०० रुपये दर महिन्याला वेळेवर देणेदेखील सरकारसाठी डोकेदुखी ठरत आहे. यावर उपाय म्हणून निवडणुकीनंतर पात्रतेच्या निकषावर छाननी करून काही महिलांना या योजनेतून वगळण्यात आले. निवडणुकीपूव मतदारांना खुश करण्यासाठी कोणतेही निकष, पात्रता न लावता योजना राबवायची व निवडणुकीनंतर या योजनेच्या पात्रतेची छाननी करायची, अशाप्रकारची ही योजना महाराष्ट्रात अभिनव ठरली. निकषाच्या पात्रतेवर या योजनेतून ९ लाखांहून अधिक महिलांना अपात्र ठरवण्यात आले असताना, आता या योजनेच्या नावाने नागरिकांची फसवणूक झाल्याचे उघड झाले आहे. गुजरातमधील एक मोठी टोळी महिलांच्या नावाऐवजी पुरुषांच्या नावाने बनावट खाती उघडून त्यांच्या खात्यावरील योजनांचे पैसे लुबाडत होती. पोलिसांनी तपासात १०० हून अधिक बनावट खाती बंद करून जवळपास १९ लाखांहून अधिक रक्कम वाटप थांबवले आहे. लाडकी बहीण योजना महिलांसाठी असली तरी आरोपींनी तयार केलेली बहुतांश बँक खाती पुरुषांची होती. या प्रकरणातून योजनेच्या पडताळणी प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. लालफिती कारभाराचा फटका आता या योजनेला देखील बसल्याचे उघड झाले आहे. सरकार एकीकडे इतर विभागांचा निधी वळवून लाडक्या बहिणींना देत असताना, हा निधी खऱ्या लाभाथ महिलांऐवजी भामट्या भावांच्या नावावरच जमा होत असल्याचे उघड झाले आहे. लाडक्या बहीण योजनेसाठी काही दिवसांपूव सामाजिक न्याय खात्याचा जवळपास ४००-४२५ कोटी रुपयांचा निधी वळवला नाही तर पळवला होता. कारण सामाजिक न्याय विभागाचे मंत्री संजय शिरसाठ यांना याबाबत काहीच माहिती नव्हती. पत्रकारांकडून हा निधी वळवल्याचे त्यांना कळाले. त्यावर संतप्त होत त्यांनी सामाजिक खात्याची आवश्यकता नसेल किंवा त्या खात्यामध्ये पैसे खर्च करायचे नसतील तर ते खाते बंद केले तरी चालेल, अशी जाहीर नाराजी व्यक्त केली होती. शिरसाठ हे एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचे आमदार असून, त्यांचा रोख हा राष्ट्रवादी काँग्रेसचे अर्थमंत्री अजित पवार यांच्याकडेच होता. सामाजिक न्याय खाते हे दलित वर्ग, पीडित वर्गांसाठी असून, या खात्याचा निधी अन्य योजनांसाठी वळवता येत नाही. आता केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून लाडक्या बहिणींना २१०० रुपये द्या, पण सामाजिक न्याय विभागाचे पैसे वळवणे चुकीचे असल्याचे म्हणत आपली नाराजी व्यक्त केली आहे. संजय शिरसाठ यांच्याप्रमाणेच भूमिका घेत आठवले यांनी सामाजिक न्याय खाते बंद करायला नको, खाते बंद केल्यास माझे मंत्रिपद जाईल, अशी कोपरखळी मारली आहे. सत्तेसाठी एकत्र आलेल्या महायुतीतील सहकारी पक्षांनी निवडणुकीत या योजनेचे तोंडभरून कौतुक केले. निवडणुकीत या योजनेच्या प्रचारासाठी २०० कोटींचा खर्च करण्यात आला. त्यावेळी या योजनेचे गोडवे गाणारे महायुतीतील नेते आता आपल्या खात्याचा निधी पळवला जात असल्याने जाहीर नाराजी व्यक्त करताना दिसत आहेत. शिरसाठ, आठवले या महायुतीतील मंत्र्यांच्या जाहीर नाराजीने महायुतीत अनेक राजकीय प्रश्न निर्माण केले आहेत. विधानसभा निवडणुकीपूव विकासाच्या दिशेने धावणारे हे तीनचाकी सरकार आता तिन्ही दिशांना धावताना दिसत आहे. लाडक्या बहिणींसाठी एकेकाळी एकत्र आलेले हे सहकारी आता आपल्या खात्याचा निधी पळवल्याने आपल्याला सावत्र भावासारखी वागणूक दिली जात असल्याचे बोलून दाखवू लागले आहे. माझी लाडकी बहीण योजनेचा भार आता इतर विभागांवर होताना दिसत आहे. निवडून आल्यानंतर अर्थमंत्री अजित पवार यांनी अनेक अनावश्यक योजनांना कात्री लावण्याचे व प्रत्येक विभागाने काटकसरीचे धोरण स्वीकारावे, अशा सूचना केल्या होत्या. मात्र अनावश्यक योजनांमध्ये लाडकी बहीण योजना बसत नाही का? हा खरा प्रश्न आहे. खऱ्या अर्थाने गरजू असणाऱ्या महिलांसाठी इतर पाच ते सहा योजना असताना, सरकारने आपल्या या 'लाडक्या' योजनेचे परीक्षण करण्याची गरज आहे; अन्यथा राज्यात पुन्हा सत्ता स्थापनेसाठी गेमचेंजर ठरणारी ही योजना महायुती सरकारला पायउतार करण्यासाठी गेमचेंजर ठरू नये.

**प्रशांत बाफना/अहिल्या नगर जिल्हा प्रतिनिधी**
**८०५५४४०३८५**



महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा ना श्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांची मुंबई येथील निवासस्थानी आमदार श्री नारायण कुचे यांनी भेट घेतली यावेळी जालना भाजपा जिल्हाध्यक्षपदी निवड केल्याबद्दल आमदार कुचे यांनी फडणवीस साहेब यांचे आभार मानले.




## देगलूर उपजिल्हा रुग्णालयात जागतिक परिचारिका दिनानिमित्त सन्मान सोहळा

देगलूर । प्रतिनिधी

जागतिक परिचारिका दिनानिमित्त देगलूर उपजिल्हा रुग्णालयात आयोजित सत्कार सोहळ्यात वैद्यकीय अधीक्षक डॉ. नरेश देवणीकर, डॉ. अनिल थडके आणि सर्व कर्मचारी वर्गाने महाराष्ट्र आरोग्य सन्मान २०२५ पुरस्काराचा सन्मान स्वीकारला.डॉ. देवणीकर यांनी हा सन्मान सर्व नर्सेस व ब्रदर्स यांच्या निष्ठावान सेवेचे फल असल्याचे सांगून त्यांचा मोमेंटो व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.कार्यक्रमास डॉ. मलशेटवार, डॉ. पाटील, डॉ. नुनेवार, डॉ. मुजीब, डॉ. लाडके, इतर डॉक्टर्स, नर्सेस, ब्रदर्स व कर्मचारी उपस्थित होते.यावेळी मनीषा बोईंनवाड, मोमीन गौसिया, रेणुका धुमाळे यांच्यासह अनेक परिचारिका, ब्रदर्स आणि विभाग प्रमुख यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.




# केज पंचायत समिती मध्ये छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी

केज/प्रतिनिधी

केज पंचायत समिती मध्ये छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहातसाजरी करण्यात आली.प्रथम छत्रपती संभाजी महाराज यांच्याप्रतिमेला पुष्पहार घालून धुप, दिप,गुलाल लावुन अभिवादन करण्यात आले.स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती पंचायत समिती मध्ये मोठ्या उत्साहातसाजरी करण्यात आली यावेळी उपस्थित गटविकास अधिकारी श्रीमती समृद्धी दिवाणे मॅडम, सहाय्यक गटविकास अधिकारी श्री राठोड साहेब,श्रीमती सविता शेप मॅडम,ढोकर साहेब विस्तार अधिकारी, रोडेवार साहेब,मुळे साहेब,मासूमदार साहेब,मेनकुदळे साहेब,बनकर मॅडम, पवार मॅडम,राऊत मॅडम,केदार मॅडम इत्यादी सर्व कर्मचारी उपस्थित होते.